सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ११३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गतिमान भूसंपादन करून औद्योगिक विकासाला चालना द्यावी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; मुख्यमंत्र्यांनी घेतला एमआयडीसीअंतर्गत प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा

**मुंबई :** राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत आहे. या विस्तारातूनच औद्योगिक विकास होणार आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भात आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह,यांच्यासह संबंधित विविध वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज, रिअल-टाईम ट्रॅकिंग, ऑफर लेटर आणि वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण; तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १ हजार१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यातून ५ हजार ५०२ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे. राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील ९७ सामंजस्य करारांतर्गत सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची मागणी आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

परवाना प्रक्रिया सुलभ

- उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे; तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. - प्रकल्पाचे स्वरूप आणि गुंतवणुकीच्या प्रमाणानुसार भूखंड विकासासाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्यात यावी. निर्धारित मुदतीत बांधकाम सुरू करणे बंधनकारक राहणार असून, विकासात विलंब झाल्यास टप्प्याटप्प्याने दंड आकारणे; तसेच आवश्यकतेनुसार भूखंड पुन्हा ताब्यात घेण्याची तरतूदही प्रस्तावित करावी. औद्योगिक जमिनीच्या वापरात सुसूत्रता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी देश-विदेशातील सर्वोत्तम पद्धती; तसेच इतर राज्यांतील धोरणांचा अभ्यास करून नवीन जमीन वाटप निकष निश्चित करावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## सुप्रीम कोर्टातील न्यायाधीशांची संख्या वाढविणारे विधेयक राज्यसभेत मंजूर

**नवी दिल्ली, 05 ऑगस्ट :** राज्यसभेने बुधवारी विरोधकांच्या सभात्यागाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या 33 वरून 37 करण्यासंबंधीचे सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीश संख्या) सुधारणा विधेयक, 2026 ध्वनिमताने मंजूर केले. यापूर्वी लोकसभेनेही या विधेयकाला मंजुरी दिल्याने संसदेची अंतिम मंजुरी पूर्ण झाली असून, हे विधेयक 16 मे 2026 रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशाची जागा घेणार आहे.

विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितले की, न्यायपालिकेतील सुधारणा गतीमान करणे आणि प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. चार नवीन न्यायाधीशांच्या नियुक्तीमुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या 37 झाली असून, सरन्यायमूर्तींसह एकूण संख्या 38 वर पोहोचली आहे. मेघवाल यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता न्यायाधीशांची संख्या वाढविणे ही काळाची गरज होती. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनीही पंतप्रधानांना पत्र लिहून नव्या प्रकरणांच्या वाढत्या ओघामुळे अतिरिक्त न्यायाधीशांची आवश्यकता व्यक्त केली होती. संविधान पीठाच्या सुनावण्यांमुळे नियमित प्रकरणांसाठी उपलब्ध न्यायाधीशांची संख्या अपुरी पडत असल्याने सरकारने अध्यादेशाद्वारे तातडीने 4 न्यायाधीशांची नियुक्ती केली.

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी जानेवारीअखेर सर्वोच्च न्यायालयात 92 हजार 101 प्रकरणे प्रलंबित होती. गेल्या वर्षी 2025 मध्ये 65 हजार 615 प्रकरणांचा निपटारा झाला, मात्र त्याच कालावधीत 75 हजार 410 नवी प्रकरणे दाखल झाली. प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, त्यासाठीच न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मेघवाल यांनी सांगितले की, न्यायालयांमध्ये सर्वाधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी विशेष खंडपीठे स्थापन करण्यात आली आहेत.

## शिर्डीत घराचे कुलूप तोडून चार मोबाईल व पैशाची पिशवी चोरट्यांनी केली लंपास

**शिर्डी ( प्रतिनिधी ) :** बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने बांधकाम मजुरांचे रोख रक्कम असलेली पिशवी व चार मोबाईल असा मिळून 65 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची खळबळ जनक घटना शिर्डी शहरात घडली आहे या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

याप्रकरणी पश्चिम बंगाल येथील मूळचा व सध्या शिर्डी येथील कालिकानगर मध्ये राहत असलेले आरीफुल लालू बिश्वास वय 33 वर्ष धंदा मजुरी याने शिर्डी पोलिसात फिर्याद दिली असून यामध्ये म्हटले आहे की मी व माझा भाऊ सारीजूल बिश्वास तसेच मित्र अजिबुल शेख व रज्जाक मालिक आम्ही सर्व शिर्डीत सेंट्रींग चे काम करून उपजीविका चालवतो दि 3 ऑगस्ट रोजी रात्री साडेअकरा वाजेनंतर आम्ही राहत असलेल्या रूमच्या शेजारी असलेल्या आमचे कामाचे ठिकाणी काम करण्यासाठी घराला कुलूप लावून गेलो होतो त्यानंतर दि. 4 ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास आम्ही काम करून रूमवर आलो असता आम्हाला रूमचे लॉक तुटलेले दिसून आले तसेच खोलीत आत जाऊन पाहिले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले आमचे सर्वांचे मोबाईल फोन व पैसे ठेवलेली पिशवी ठेवलेल्या ठिकाणाहून गायब झाली असल्याचे निदर्शनास आले कोणीतरी अज्ञात चोरट्याने आमच्या रूमचे लॉक तोडून घरात प्रवेश करून चोरी केली असल्याची खात्री झाली त्यानंतर आम्ही घरमालक सुनील कोते यांना याबाबत माहिती दिली त्यांनी शिर्डी पोलीस स्टेशनला या चोरी संदर्भात माहिती दिली या चोरीमध्ये एकूण 65 हजार रुपये किंमतीचे चार मोबाईल व पैशाची पिशवी चोरट्यांनी चोरून नेली आहे पोलिसांनी बिश्वास याचे फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक करत आहे

## "गडकरींच्या विरोधातील आक्षेपार्ह पोस्ट हटवा"- हायकोर्ट

### सोशल मिडीया साईट मेटा, एक्स आणि गुगलला निर्देश

**मुंबई, 05 ऑगस्ट :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या विरोधात सोशल मिडीया आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरील आक्षेपार्ह पोस्ट तत्काळ हटवण्यात याव्यात असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिलेत. गडकरींच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने या पोस्टना घृणास्पद, अपमानास्पद, अश्लील आणि मानहानीकारक असल्याचे म्हटले आहे.

न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने मेटा, एक्स (पूर्वीचे ट्विटर) आणि गुगल यांसारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मना अशा प्रकारच्या पोस्ट स्वतःहून हटवण्यासाठी योग्य यंत्रणा विकसित करण्याचे निर्देश दिले. उच्च न्यायालयाने सांगितले की, अशा आक्षेपार्ह सामग्रीला ऑनलाइन कोणतीही जागा मिळू नये, कारण ती मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचते आणि विशेषतः तरुण पिढीवर त्याचा परिणाम होऊ शकतो.



न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला की, एवढे प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध असताना अशा प्रकारच्या सामुग्रीचा शोध घेऊन ती हटवण्यासाठी प्रभावी प्रणाली का तयार केली जाऊ शकत नाही, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केले.

न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांनी सांगितले की, एखादी व्यक्ती अश्लील किंवा मानहानीकारक सामग्री अपलोड करत असेल, तर ती त्वरित हटवली गेली पाहिजे. त्यांनी ऑनलाइन प्लॅटफॉर्मना भविष्यात अशा प्रकारच्या पोस्टबाबत स्वतःहून कारवाई करण्यासाठी यंत्रणा तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच भविष्यात नितीन गडकरी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी अशा पोस्टबाबत ऑनलाइन प्लॅटफॉर्मशी संपर्क साधल्यास, संबंधित प्लॅटफॉर्मने ती सामग्री हटवण्यासाठी तातडीने पावले उचलावीत असेही हायकोर्टाने स्पष्ट केले.

दरम्यान, नितीन गडकरी यांनी इथेनॉल धोरणासंदर्भात त्यांच्याविरोधात करण्यात आलेल्या पोस्टबाबत मेटा, गुगल आणि एक्सविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी मानहानीकारक मजकुरासाठी 11 कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणीही केली आहे.

याचिकेत दावा करण्यात आला होता की, इथेनॉल धोरणासाठी गडकरी यांना वैयक्तिकरित्या जबाबदार ठरवण्यात आले असून, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला या धोरणातून आर्थिक फायदा झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. मात्र, इथेनॉल मिश्रण कार्यक्रम आणि ई-20 धोरणाची अंमलबजावणी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून केली जाते, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट; अमरनाथ यात्रेला तात्पुरती स्थगिती

**श्रीनगर, 05 ऑगस्ट :** जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटविण्यात आल्याच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त बुधवारी कडक सुरक्षा व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अमरनाथ यात्रेचा जम्मूतील बेस कॅम्पमधून होणारा प्रवास एक दिवसासाठी स्थगित करण्यात आला आहे. प्रशासनाने भगवतीनगर येथील जम्मू बेस कॅम्पमधून अमरनाथ यात्रा एक दिवसासाठी स्थगित करण्यामागील कोणतेही ठोस कारण जाहीर केले नसले, तरी सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, सध्याची सुरक्षा परिस्थिती लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी जम्मू बेस कॅम्पमधून पहलगाम (अनंतनाग जिल्हा) आणि बालटाल (गांदरबल जिल्हा) येथील बेस कॅम्पकडे जाणाऱ्या कोणत्याही नव्या यात्रेकरूंच्या तुकडीला परवानगी देण्यात आलेली नाही. अधिकृत सूत्रांनी सांगितले की, जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर (NH-44) सुरक्षा दलांच्या ताफ्यांची वाहतूकही तात्पुरती थांबवण्यात आली आहे.

## आरबीआयने किरकोळ महागाई दराचा अंदाज कमी करून केला 5 टक्के

### जीडीपी वाढीचा अंदाज 6.7 टक्क्यांपर्यंत वाढवला

**मुंबई, 05 ऑगस्ट :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) बुधवारी चालू आर्थिक वर्ष 2026-27 साठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज वाढवून 6.7 टक्के आणि किरकोळ महागाई दराचा अंदाज कमी करून पाच टक्के केला आहे.

आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी चलनविषयक धोरण समिती (एमपीसी) च्या तीन दिवसीय द्वैमासिक आढावा बैठकीनंतर माहिती देताना सांगितले की, रेपो दर 5.25 टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, चलनविषयक आढाव्यात एकमताने आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये वास्तविक जीडीपी विकास दर 6.7 टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामध्ये पहिल्या तिमाहीत सात टक्के, दुसऱ्या तिमाहीत 6.4 टक्के, तिसऱ्या तिमाहीत 6.5 टक्के आणि चौथ्या तिमाहीत 6.8 टक्के वाढीचा अंदाज आहे. दोन्ही बाजूंनी चढ-उताराचे धोके संतुलित आहेत. आरबीआय गव्हर्नर यांनी चालू आर्थिक वर्ष 2026-27 च्या तिसऱ्या द्वैमासिक चलनविषयक धोरणाची घोषणा करताना सांगितले की, जागतिक अर्थव्यवस्थेत सुरू असलेल्या अस्थिरतेचा देशांतर्गत आर्थिक घडामोडींवरही काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो. मल्होत्रा यांनी सांगितले की, जागतिक अनिश्चितता असूनही चालू आर्थिक वर्षाच्या (एप्रिल-जून) पहिल्या तिमाहीतील प्रमुख आकडे देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील मजबुती दर्शवतात.

त्यांनी सांगितले की, भू-राजकीय घडामोडींमुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये चढ-उताराची स्थिती कायम आहे, त्यामुळे नजीकच्या काळातील परिस्थितीबाबतही अनिश्चितता आहे. मल्होत्रा यांनी सांगितले की, आतापर्यंत महागाईचा सामान्य दबाव कमी आहे, परंतु अन्नपदार्थ, इंधन आणि इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने व्यापक स्तरावर महागाई वाढण्याचा धोका कायम आहे.

## नाथसागराच्या १८ द्वारातून गोदावरी पात्रात विसर्ग

**मंगलसिंग भवरे :-** नाथसागर जलाशय पाणलोट क्षेत्रात सुरू असलेला पाऊस आणि नाशिक व नगर जिल्ह्यातील धरणांमधून नाथसागर येणाऱ्या पाण्याचे आवक पाहता दिनांक ४ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी ६ वाजून ११ मिनिटांना गोदावरी खोऱ्याचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश हासे यांच्या हस्ते धरणाच्या द्वाराची कळ दाबून गोदावरी पात्रात धरणाच्या २७ पैकी १८ द्वार अर्ध्या फुट उचलून गोदावरी पात्रात दहा हजार क्यूसेक प्रमाणे पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

धरण क्षेत्रात सुरू असलेला पाऊस आणि नाशिक नगर भागात झालेल्या जोरदार पावसामुळे नाथसागर जलाशय ४३ हजार क्यूसेक प्रमाणे पाण्याची आवक होत आहे. ही परिस्थिती पाहता एक दिवसापूर्वीच पाणी सोडण्याबाबत जायकवाडी पाटबंधारे विभागाने गोदावरी पात्रावरील गावातील नागरिकांना सतर्क राहण्याचे सूचना देण्यात आल्या होत्या त्यावरून पाण्याची आवक वाढल्याने मंगळवारी सायंकाळी नाथसागर जलाशयातून गोदावरी पात्रात विसर्ग करण्यात आला. यावेळी गोदावरी खोरे कार्यकारी संचालक जयंत गवळी जायकवाडी पाटबंधारे विभागाचे



कार्यकारी अभियंता गणेश हासे सह कार्यकारी अभियंता श्रद्धा निंबाळकर, स्वीय सहाय्यक नामदेव खराद,शाखा अभियंता रितेश भोजने, सहाय्यक अभियंता अब्दुल गाझी, बाळासाहेब नजन,गणेश खराडकर,संजय चव्हाण, अरविंद थोरात, विठ्ठल पोकळे शशिकांत डमाळे, शेषेराव अडसूळ,विवेक वाघ, बाळू गातूळे,विलास पोकळे,मंगेश सोळाट आदींची उपस्थिती होती.

५१ वर्षांच्या इतिहासात १७ वेळेस पूर्ण क्षमतेने भरले नाथसागर.

पर्जन्यमान आणि इतर गोष्टीने अगोदर दहा वर्षाच्या खंडानंतर भरणारे जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची ही १७ वी वेळ आहे. तर गेल्या चार वर्षांपासून सलग रित्या नाथसागर जालशय पूर्ण क्षमतेने भरत आहे. आजरोजी नाथसागर जलाशयाचा पाणी साठा हा ९२ टक्के झाला असून धरणात ४३ हजार ३०१ क्यूसेक प्रमाणे पाण्याची आवक होत आहे.तर जलाशयाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून ही विसर्ग कारण्यात येत आहे. जलाशातून गोदावरी पात्रात होत असलेला विसर्ग विहंगम दृष्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## राहुल गांधी संसदचे कामकाज चालू देत नाहीत : गौरव भाटिया

**नवी दिल्ली, 05 ऑगस्ट :** राहुल गांधी संसदचे कामकाज चालू देत नाहीत आणि लोकशाही जबाबदाऱ्यांचे पालन करण्याऐवजी ते सातत्याने बेजबाबदार वक्तव्ये करत आहेत. असे भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी सांगितले. या वेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाने 5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 हटविण्याच्या सातव्या वर्धापन दिनाला देशासाठी "गौरवाचा क्षण" असल्याचे सांगत काँग्रेस आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर तीव्र टीका केली.

भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत प्रवक्ते गौरव भाटिया यांनी सांगितले की, 5 ऑगस्ट 2019 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संविधानात तात्पुरती तरतूद म्हणून समाविष्ट करण्यात आलेले कलम 370 रद्द करण्यात आले, ज्यामुळे संविधानाच्या मूळ भावनेचा सन्मान झाला. त्यांनी सांगितले की, तत्कालीन गृहमंत्री अमित शाह यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या इच्छाशक्तीचा परिचय देत हा ऐतिहासिक निर्णय लागू केला. संसदेतील सध्याच्या गतिरोधाला त्यांनी दोन विचारधारांमधील लढा असल्याचे सांगितले.

## हैबतपूर येथे बालविवाह रोखला

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.५:** गंगापूर तालुक्यातील हैबतपूर येथे अल्पवयीन मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती मिळताच गंगापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पाटील यांना तत्काळ घटनास्थळी धाव घेत बालविवाह रोखला.

हैबतपूर येथे अल्पवयीन मुलीचा विवाह आयोजित करण्यात आल्याची माहिती पोलीस पाटील यांना मिळाली होती. माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी आपल्या पथकाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून संबंधित कुटुंबीयांशी चर्चा केली. पोलिसांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती देत अल्पवयीन मुलीचा विवाह लावून न देण्याबाबत समज दिली. तसेच मुलीचे वय निश्चित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. पोलिसांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे होणारा बालविवाह थांबविण्यात यश आले. अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होत असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.- पोलीस निरीक्षक सलीम चाऊस

## मुंबई महामार्गादरम्यान लासूरगावच्या शिवना नदीवरील पुल तुटलेले कठडे आणि खड्ड्यांच्या विळख्यात

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी) :** नागपूर–मुंबई महामार्गावरील लासूरगाव येथील शिवना नदी पुलाची दुरवस्था झाली असून तुटलेले कठडे, खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

या पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक बनली असून पुलावरील संरक्षण कठडे अनेक महिन्यांपासून तुटलेल्या अवस्थेत आहेत. याशिवाय पुलावर तसेच लगतच्या रस्त्यावर अनेक लहान-मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस दुरुस्ती होत नसल्याने वाहनचालक, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

महामार्गावरील या पुलावरील कठडे तुटलेले असल्यामुळे एखाद्या वाहनाचा ताबा सुटल्यास ते थेट शिवना नदीच्या पात्रात कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात खड्ड्यात पाणी साचल्यास वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही त्यामुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही संबंधित यंत्रणा दाखल घेत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

महामार्गाची अवस्था देखील अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी डांबरीकरण उखडून



गेले असून वेगाने जाणाऱ्या वाहनांच्या टायरच्या दाबामुळे दगड उडून दुचाकीस्वार, पादचारी आणि रस्त्याकडेला उभ्या असलेल्या नागरिकांना दुखापत झाल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.या महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना सतत कसरत करावी लागत आहे.खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात समोरून येणाऱ्या वाहनांशी धडक होण्याच्या घटना घडत असून यापूर्वीही अनेक गंभीर अपघातांमध्ये निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर अनेक जण कायमचे अपंग झाले आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील ए.एस. क्लबपासून सुरू होणारा हा नागपूर–मुंबई महामार्ग लासूर स्टेशन, वैजापूर, कोपरगाव, शिर्डी, संगमनेर आणि येवला या महत्त्वाच्या शहरांना जोडतो. तसेच हडसपिंपळगाव येथून समृद्धी महामार्गावर जाण्यासाठीही याच मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या लाखो भाविकांसाठी हा मार्ग अंतर व वेळ वाचवणारा असल्याने येथे नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते.

स्थानिक नागरिक, वाहनचालक व सामाजिक संघटनांनी तातडीने शिवना नदी पुलावरील तुटलेले कठडे नव्याने उभारावेत, पुलावरील तसेच संपूर्ण महामार्गावरील खड्डे त्वरित बुजवावेत, दर्जेदार डांबरीकरण करावे आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना त्वरित राबवाव्यात अशी मागणी केली असून भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांवर राहील असा इशाराही दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

### अंबाजोगाईत FDA च्या पथकाची धडक कारवाई; अंबाजोगाईत भेसळीच्या बाजारावर मोठा घाव.व्यापाऱ्यांत मोठी खळबळ!

# सदर बाजार चौकातील 'तबक्कल चायनीज' सील; चिकन व मसाल्यांचे नमुने जप्त, दुकान उघडण्यास बंदी!

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात अन्न सुरक्षा व औषध प्रशासन (FDA) विभागाने मोठी धडक कारवाई करत भेसळीच्या संशयावरून सदर बाजार चौक, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय रस्त्यावरील 'तबक्कल चायनीज' या खाद्य व्यावसायिक आस्थापनावर छापा टाकला.

या कारवाईसाठी तब्बल १० ते १२ अधिकाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. पथकाने दुकानातील चिकन तसेच विविध मसाल्यांचे नमुने (Samples) तपासणीसाठी घेतले. त्यानंतर संबंधित आस्थापनेला नोटीस बजावून नमुने तपासणीचा अहवाल येईपर्यंत दुकान सुरू करण्यास बंदी घालण्यात आली असल्याची माहिती मिळाली आहे.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, प्रयोगशाळेतील अहवालात नमुने सुरक्षित व निकषांनुसार असल्याचे सिद्ध झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल. अहवाल प्रतिकूल आल्यास संबंधितांवर Food Safety and Standards Act, 2006 तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांनुसार कठोर कारवाई होऊ शकते.




**FDA चे महत्त्वाचे नियम :**

अन्नपदार्थ सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार असणे बंधनकारक.

संशयित अन्नपदार्थांचे नमुने घेऊन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणी केली जाते.

निकृष्ट किंवा भेसळयुक्त अन्न आढळल्यास दंड,परवाना निलंबन किंवा रद्द करणे तसेच न्यायालयीन कारवाईची तरतूद आहे.

गंभीर प्रकरणांमध्ये दोषी आढळल्यास कारावासाचीही शिक्षा होऊ शकते.

या धडक कारवाईमुळे अंबाजोगाई शहरातील खाद्य व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर FDA ची नजर अधिक कडक झाल्याची चर्चा सुरू आहे. येत्या काळात शहरातील इतर खाद्य आस्थापनांचीही तपासणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अंबाजोगाईत भेसळखोरांना इशारा.

नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना आता FDA चा दणका बसणार.

## भारतीय जनता पार्टीचे हर घर तिरंगा अभियान जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात राबवणार : शंकर देशमुख

**बीड:** भारतीय जनता पार्टीचे हर घर तिरंगा अभियान बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात यशस्वीपणे राबवणार असल्याचे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले. भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण,लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या सुचनेनुसार बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या हर घर तिरंगा अभियानाच्या जिल्हा बैठकीत जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख बोलत होते.




बैठकीचे प्रास्ताविक करतांना अभियानाचे जिल्हा संयोजक प्रा. देविदास नागरगोजे यांनी अभियानाचे महत्व विशद करून अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले तर अजय सवाई, भाग्यश्री ढाकणे महत्वाच्या सूचना केल्या. बैठकीचा अध्यक्ष समारोप करताना शंकर देशमुख यांनी बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत हर घर तिरंगा अभियानाचे महत्त्व वाढत असून कार्यकर्त्यांनी राष्ट्रभक्तीचा जागर करण्यासाठी हे अभियान यशस्वीपणे जिल्हाभर राबवावे असे आवाहन केले.

बैठकीस यावेळी नवनाथ अण्णा शिराळे, शिवाजी आप्पा मुंडे, रामदास बडे,गणेश लांडे, अजय सवाई, शांतिनाथ डोरले, मीराताई गांधले, सुवर्णाताई लांबरुड प्रा. देविदास नागरगोजे, दत्तप्रसाद जाधव, भाग्यश्रीताई ढाकणे, डॉ. ज्योतीताई घुमरे, शैलजाताई मुसळे, लताताई मस्के, भूषण पवार, अशोक रसाळ, राजेंद्र पवार, नानासाहेब शिंदे, विलास बामणे, महादेव नागरगोजे, हरीश खाडे, राजेश चरखा, भालचंद्र कुलकर्णी, बांडे काका, अंगद देवडकर, राजेश गवळी, संतोष गवळी, विठ्ठल ठोकळ आदेश पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..

### बालासाहेब चाटे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा
## विद्यार्थी प्रेमी शिक्षक हीच बालासाहेब चाटे यांची ओळख : उपस्थितांकडून गौरव




**केज दि ४(प्रतिनिधी) :** मैंदवाडी येथील जि प उच्च प्राथमिक शाळेचे प्र मुख्याध्यापक बालासाहेब गिना चाटे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा तांबवेश्वर मंगल कार्यालयात शनिवार रोजी संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष धारूरचे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय कोकणे,प्रमुख उपस्थिती डॉ अशोक थोरात,प्र गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे,ईश्वर मुंडे, सोमनाथ माने,नगराध्यक्ष सीताताई बन्सोड,हारूनभाई इनामदार,महादेव सूर्यवंशी, कक्ष अधिकारी अश्विनी चाटे,दत्तात्रय चौरे,दत्तात्रय चाटे,सुदर्शन काळे,संजय चौरे आदर्श शिक्षक समिती जिल्हा सचिव महादेव ढाकणे आदींची उपस्थिती होती

**शेवटच्या दिवशी शाळेत शेवटचा ३ ते ४ :**३० या वेळेत अध्यापन करून ३८ वर्ष आदर्श शिक्षक म्हणून सेवा केली.अनेक चांगले विद्यार्थी त्यांनी घडवले.कर्तव्यनिष्ठ आदर्श शिक्षक म्हणून उपस्थितांनी गौरव केला.कार्यक्रमास शिक्षक शिक्षण प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमृता फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरास बीडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड, 05 ऑगस्ट :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरास नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. लाभार्थ्यांची वाढती संख्या आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लक्षात घेऊन शिबिराची मुदत वाढविण्यात आली असून, आता हे शिबिर दि. ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजीही सुरू राहणार आहे.



अमृतावहिनी फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात त्यांचा फेटा व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी या जनहिताच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत नागरिकांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच शिबिरास आवर्जून उपस्थित असलेले पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांचा देखील सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. नागरिकांच्या भरभरून प्रतिसादामुळे हे महाआरोग्य शिबिर जनतेच्या विश्वासाचे आणि लोकसेवेच्या संकल्पनेचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे याचे मनस्वी समाधान आहे.याप्रसंगी आष्टी शिरूर पाटोदा तालुक्यामधील महंत, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी, डॉक्टर्स, वैद्यकीय कर्मचारी आणि मोठ्या संख्येने लाभार्थी नागरिक- बंधू भगिनी उपस्थित होते.

### बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गांच्या कामांबाबत खा.बजरंग सोनवणे यांची गडकरींसोबत चर्चा



**बीड, 05 ऑगस्ट :** नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सदिच्छा भेट घेऊन बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गांच्या कामांबाबत सविस्तर चर्चा केली.यावेळी केज शहरातील वाढती वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग NH-548D वर शहराच्या दक्षिण बाजूस वळण रस्ता (बायपास) उभारण्याची मागणी केली. तसेच बीड जिल्ह्यातील अपूर्ण, संथ गतीने सुरू असलेले व निकृष्ट दर्जाच्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांची सखोल चौकशी करून संबंधित यंत्रणांवर आवश्यक ती कार्यवाही करावी आणि सर्व कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशीही मागणी केली. यावेळी नितीन गडकरी यांनी दोन्ही मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती चौकशी करून प्रस्तावांवर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील, तसेच या कामांबाबत प्राधान्याने निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.बीड जिल्ह्यातील रस्ते विकासाची सर्व कामे दर्जेदार, वेळेत आणि लोकहित लक्षात घेऊन पूर्ण व्हावीत, यासाठी माझा सातत्यपूर्ण पाठपुरावा पुढेही कायम राहील. असे खा. बजरंग सोनवणे यांनी सांगितले.

## प्रवीण सरवदे यांना पीएच.डी.प्रदान



**केज (प्रतिनिधी) :** तालुक्यातील होळ येथील भूमिपुत्र आडस येथील कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विषयाचे सहाय्यक प्राध्यापक प्रवीण दत्तात्रय सरवदे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडून लोकप्रशासन विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. संशोधन मार्गदर्शक प्रा डॉ विलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले. ग्रामीण विकास प्रशासनातील दलित वस्ती सुधार योजनेमधील लोकसहभागाचा विश्लेषणात्मक अभ्यास - विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. लोकप्रशासन विषयातील अमरावती विद्यापीठातून पीएचडी पदवी संपादन करणारे पहिले संशोधक विद्यार्थी आहेत. या यशाबद्दल त्यांचे संस्थेचे रमेशराव आडसकर,प्राचार्य डॉ अनिल किर्दंत ,प्रकाश लगस्कर,प्रा डॉ सुरेश कांबळे, डॉ हनुमंत सौदागर, सरपंच,योगेश शिंदे,बाळासाहेब घुगे,रमेश पाटोळे, मिलिंद व्हावळे,प्रा भैय्यासाहेब सरवदे,संदीप सरवदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयात ‘कमवा व शिका’ योजनेतील विद्यार्थ्यांचे स्तुत्य श्रमदान; औषधी वनस्पती उद्यानाची केली स्वच्छता

**किल्ले धारूर (प्रतिनिधी):** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयात ‘कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण कमवा व शिका योजने’तील विद्यार्थ्यांनी श्रमदानातून सामाजिक बांधिलकी जपत महाविद्यालयातील औषधी वनस्पती उद्यानाची स्वच्छता केली.



शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत कार्यरत असलेल्या ‘कमवा व शिका’ योजनेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. उद्यानात वाढलेले अनावश्यक गवत (तन), वाळलेली पाने व कचरा उचलून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच झाडांची योग्य जोपासना व्हावी याकरिता सर्व झाडांना आळे करण्याचे काम विद्यार्थ्यांनी कौशल्याने पूर्ण केले. स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठेचे मूल्य रुजवावे, या उद्देशाने या श्रमदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांच्या या श्रमदानाचे व शिस्तबद्ध कार्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. उपक्रम यशस्वी पार पाडल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. धनराज सोळंके, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या श्रमदान उपक्रमासाठी ‘कमवा व शिका’ योजनेचे समन्वयक प्रा. नागोराव वाघमारे आणि प्रा. विनायक कापावार यांचे मोलाचे मार्गदर्शन व

## रोटरीने केला गुणवंतांचा सत्कार



**अंबाजोगाई :** येथील रोटरीक्लबच्या वतीने नीट परीक्षेतील गुणवंत विदयार्थी व पालकांचा सत्कार केला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष शेख शकील होते . याप्रसंगी सचिव राधेशाम लोहिया , प्रा . रोहिनी पाठक, डॉ . नवनाथ घुगे यांची विशेष उपस्थिती होती .

या प्रसंगी नीट परीक्षेत यशस्वी झालेले गुणवंत राजवीर श्रीनिवास रेड्डी, रणवीर नाथ रेड्डी, अनवी दिलीप गायकवाड,अर्णवी सचिन पोतदार यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला .

संतोष मोहिते यांनी नियोजित सामाजिक उपक्रमाची माहिती दिली . दीव दमन अधिवेशनाची माहिती कल्याण काळे व धनराज सोळंकी यांनी दिली . शेख मोईन यांनी शहरातील चौकाचे सुशोभिकरण करण्याचे अवाहन केले . डॉ सचिन पोतदार यांनी आरोग्य शिबीर घेण्याचे जाहीर केले .आगामी काळात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निश्चय क्लबचे अध्यक्ष शकील शेख यांनी व्यक्त केला .कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रूपेश रामावत यांनी केले . शेवटी राधेशाम लोहिया यांनी सर्वांचे आभार मानले .

## कांगणेवाडीतील माधवबाबा मंदिरात चोरी; पावणेदोन लाखांचे दागिने आणि रोकड लंपास

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील कांगणेवाडी येथील प्रसिध्द माधवबाबा मंदिराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने देवाच्या मूर्तीवरील सोन्या-चांदीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण १ लाख ७५ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसर आणि भाविकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. कांगणेवाडी येथील अंगद देवराव कांगणे हे गेल्या चार वर्षांपासून गावातील माधवबाबा मंदिराचे पुजारी म्हणून काम पाहतात. नित्य नियमाप्रमाणे पूजा आटोपल्यानंतर सायंकाळी मंदिरात सर्व दागिने व दानपेटी सुरक्षित होती. मात्र, दुसऱ्या दिवशी पहाट ग्रामस्थ दर्शनासाठी गेले असता मंदिराचे कुलूप तोडलेले आणि दानपेटी फुटलेली दिसून आली.

पुजाऱ्यांनी मंदिरात जाऊन पाहणी केली असता मूर्तीवरील ५८ हजार ८०० रुपयांचा चांदीचा मुकुट, ३५ हजार रुपयांची सोन्याची साखळी, ४१ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र आणि दानपेटीतील ४० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ७५ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

## 15 ऑगस्टला स्नेहसंवर्धन पुरस्काराचे वितरण; तृप्ती स्वीटचे हरीशभाई खिलोशिया यांचा होणार सन्मान

**अंबाजोगाई :** विविध प्रांतांतील नागरिकांमध्ये बंधुभाव, स्नेह आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी कार्यरत असलेल्या आंतरभारती, आंबाजोगाईच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा 'स्नेहसंवर्धन पुरस्कार' यंदा गुजरात राज्यातील राजकोट जिल्ह्यातील मोरंबी येथून अंबाजोगाई येथे येऊन स्थायिक झालेल्या तृप्ती स्वीट होमचे संचालक हरीशभाई खिलोशिया यांना प्रदान करण्यात येणार आहे.




स्वातंत्र्यदिनानिमित्त 15 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता आधार मल्टिस्टेट सभागृह, आंबाजोगाई येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. परंपरेनुसार मागील वर्षीचे पुरस्कार विजेते डॉ. विवेकानंद राजमान्य यांच्या हस्ते व आंतरभारती आंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रो डॉ शैलजा बरुरे यांच्या अध्यक्षते खाली पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या सोहळ्यास आंतरभारतीचे राष्ट्रीय मार्गदर्शक अमर हबीब आणि आंतरभारती, पुणेच्या कार्याध्यक्ष सविता कुरुंदवाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

अन्य प्रांतीयांचे स्नेहमीलन

स्नेहसंवर्धन पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने अंबाजोगाईत वास्तव्यास असलेल्या विविध राज्यांतील बंधू-भगिनींचे स्नेहमीलन आयोजित करण्यात आले आहे. विविध संस्कृती, भाषा आणि परंपरांचा सन्मान करत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा हा उपक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे. या कार्यक्रमास अंबाजोगाईतील तसेच परिसरातील अन्य प्रांतीय नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष प्रा. शैलजा बरुरे, सचिव संतोष मोहिते व संयोजक व्यंकटेश जोशी, यांनी केले आहे.

हा आगळावेगळा उपक्रम सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार असून, अंबाजोगाईतील सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद

**बीड, ५ ऑगस्ट :** परळी ग्रामीण पोलिसांनी दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आणि अट्टल आरोपीला अटक करत आणखी एक महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक मल्हार शिवरकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुश निमोणे, पोलीस हवालदार पवार (ब.क्र. ९१३) आणि पोलीस अंमलदार धनवडे (ब.क्र. १७८४) यांच्या पथकाने परळी ग्रामीण पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्रमांक ४३९/२०२५ मधील भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) अंतर्गत फरार असलेल्या आरोपीला जेरबंद केले.

अलाउद्दीन उर्फ सल्ल्या गफार सय्यद (वय ३०, रा. काळरात्री मंदिर परिसर, भीमनगर, परळी वैजनाथ) हा आरोपी गुन्हा घडल्यानंतर फरार झाला होता. त्याचा सातत्याने शोध सुरू असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शिताफीने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

### सत्यशोधक डॉ.अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त युवा आंदोलन संघटनेचा प्रेरणादायी विधायक उपक्रम
## व्याख्यान, गुणवंतांचा गुणगौरव आणि 50 गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**अंबाजोगाई :** सत्यशोधक, साहित्यरत्न आणि लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त युवा आंदोलन संघटनेच्या वतीने अंबाजोगाई येथे समाजाभिमुख व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. व्याख्यान, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप अशा विधायक उपक्रमांमुळे कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी जोड मिळाली.




सोमवारी (दि.३ ऑगस्ट) शहरातील विलासराव देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून निर्धार सामाजिक संस्थेच्या सचिव सत्यभामा सौंदरमल, डॉ.दिलीप गायकवाड, बागझरीचे सरपंच प्रशांत दहिफळे, भीमशक्तीचे कार्याध्यक्ष भीमराव सरवदे, लोकजनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा अध्यक्ष अक्षय भुंबे, तळणीचे माजी सरपंच हनुमंत गायकवाड, बेटी बचाव अभियानाचे धिमंत राष्ट्रपाल, युवा आंदोलन संघटनेचे केज तालुकाध्यक्ष सुंदर खाडे तसेच युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नीट परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सात विद्यार्थ्यांचा, दहावी व बारावीतील २० गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या २० विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व फाईल फोल्डर देऊन गौरव करण्यात आला. शिक्षणाची आवड असलेल्या पण, आर्थिकदृष्ट्या गरजू ५० विद्यार्थ्यांना वह्या, रजिस्टर, पेन आणि कंपासचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावण्यात आला. या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता आठवी, नववी व दहावीतील विद्यार्थ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांनी डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या समतावादी विचारांचा वारसा जपत समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा विधायक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी महापुरूषांचे विचार केवळ जयंती - पुण्यतिथीपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणण्याची गरज व्यक्त केली. आपला पाठीचा कणा हा नेहमी ताठ असला पाहिजे. आपण सदैव महापुरूषांच्या विचारांपुढे नतमस्तक होऊन त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. नीट परीक्षेत ६२१ गुण मिळवणारी विद्यार्थिनी अंबाजोगाईची असल्याचा संपूर्ण शहराला अभिमान आहे, असे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धिमंत राष्ट्रपाल यांनी केले, तर नवनाथ हारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रदीप लाडके, मारूती मस्के, चैतन्य कांबळे, दत्तात्रय उपाडे यांच्यासह युवा आंदोलन संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधायक उपक्रमांमुळे डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीला सामाजिक बांधिलकीची आणि शैक्षणिक प्रेरणेची अर्थपूर्ण जोड लाभल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# खुनातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात शहर पोलीसांना यश



**सिल्लोड प्रतिनिधी :** सिल्लोड शहरातील खून प्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना सोमवार रोजी सिल्लोड न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मागील आठवड्यात सिल्लोड भोकरदन रस्त्यावरील सिल्लोड शहरातील एकता पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ एका अज्ञात इसमाचा गळा चिरलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने या प्रकरणाचा छडा लावून सदरील मयत व्यक्तीची अनैतिक संबंधातून त्याची पत्नी, तिचा प्रियकर व त्याला मदत करणाऱ्या एकासह तीन आरोपींना मोठ्या शिताफीने पकडले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत अशोक ग्यानसिंग मीना (रा. वेरूळ ता. खुलताबाद) याची पत्नी कौशल्या अशोक मीना हिचे रियाज शहा खालीद शहा (रा. भोकरदन जि. जालना ह.मु. मक्राणपुर ता. कन्नड) याच्यासोबत मागील १० वर्षांपासून अनैतिक संबंध आहे. तिचा पति अशोक मीना हा त्याचे अनैतिक संबंधास अडथळा ठरत होता. म्हणुन तिने तिचा प्रियकर रियाज शहा खालीद शहा याच्यासोबत संगनमत करून पती अशोक मीना याचा खुन करण्याचे नियोजन करून मृतास कामाला लावते असे सांगून मृतास २७ जुलै रोजी सिल्लोड येथे आणून आरोपींनी केलेल्या नियोजनाप्रमाणे धारदार शस्त्राने मयतचा गळा चिरून खुन केला. पुरावे नष्ट करून वेगवेगळ्या दिशेने पळून गेले.

# सोयगाव येथे लोकसंपर्क अभियानांतर्गत तक्रार निवारण व आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
सोयगाव,दि. ५ ऑगस्ट

आमदार अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून व अध्यक्षतेखाली सोयगाव येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयात लोकसंपर्क अभियानांतर्गत नागरिकांच्या तक्रार निवारण व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.यावेळी नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची सुनावणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.

तहसील कार्यालयातील बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी फेरफार, वारस नोंद, नामांतरण, ७/१२ दुरुस्ती, ई-पीक पाहणी,पीकविमा,नैसर्गिक आपत्ती पंचनामे,महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे,शासकीय जमिनीवरील अतिक्रमण,गौण खनिजांची अवैध वाहतूक,जात,उत्पन्न व रहिवासी दाखल्यांसह सर्व महसूल विषयक प्रकरणांचा कालबद्ध निपटारा करण्याचे आदेश दिले.

आजच्या बैठकीत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर वेळेत कार्यवाही करून अर्जदाराला त्याची माहिती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच पाणंद रस्त्यांबाबतचे तिढे तातडीने सोडवून कामे सुरू करण्याचे आदेश संबंधित



अधिकाऱ्यांना देण्यात आले.पंचायत समिती कार्यालयातील बैठकीत घरकुल,विहीर,रोजगार हमी योजनेसह विविध योजनांमध्ये लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी होत. असल्याच्या तक्रारी गंभीर असल्याचे सांगत अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही,असा इशारा त्यांनी दिला.पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत लाभापासून वंचित ठेवू नये,नागरिकांच्या अर्जांचा निश्चित कालमर्यादेत निपटारा करावा,ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांना गती द्यावी तसेच पिण्याचे पाणी,रस्ते,स्वच्छता,घरकुल, शौचालय व रोजगार हमी यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार म्हणाले,जनतेची कामे हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे.शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना न्याय,सन्मान आणि वेळेत सेवा मिळाली पाहिजे.कामात दिरंगाई,हलगर्जीपणा किंवा भ्रष्टाचार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने काम करून जनतेचा विश्वास जपावा.

**प्रलंबित देयकांबाबत रोहयो मंत्री भारत गोगावले यांची भेट घेणार :** बैठकीदरम्यान वैयक्तिक सिंचन विहीर,गाय गोठा तसेच शासनाच्या विविध योजनांतील कुशल व अकुशल कामांची प्रलंबित देयके याबाबत अनेक नागरिकांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रारी मांडल्या.याची गंभीर दखल घेत, संबंधित मंत्री ना.भरत गोगावले यांची भेट घेवून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करू अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली. यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी प्रत्येक तक्रारदाराशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला जाईल,असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत अनेक नागरिकांनी रेशनचा नियमित लाभ मिळत नसल्याची तक्रार मांडली.याची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना रेशनचा लाभ मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचना आ. अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

# समता पतसंस्था राहाता शाखा व्यवस्थापक मिलिंद बनकर यास पोलिसांनी केली अटक



**शिर्डी (प्रतिनिधी) :** समता पतसंस्था राहाता शाखा व्यवस्थापक मिलिंद बनकर यास शिर्डी पोलिसांनी मंगळवारी रात्री अटक केल्याने बँक वर्तुळात खळबळ उडाली असून राहाता न्यायालयाने बनकर यांना सात ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनवली आहे.

समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत भोंदू अशोक खरात येणे जवळपास १०८ व्यक्तींच्या नावावर बँक खाते उघडून नॉमिनी म्हणून त्याचे नाव लावून खातेदारांना कुठल्याही प्रकारची माहिती नसताना त्या खात्यावर व्यवहार केल्याचा आरोप खातेदारांनी केल्यानंतर. या संदर्भात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला त्यानंतर पोलिसांनी अशोक खरात याला समता पतसंस्था बँक खाते गैरव्यवहार प्रकरणात दोन दिवसापूर्वी राहाता न्यायालयात हजर केले होते त्याला न्यायालयाने ७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपाधीक्षक अमोल भारती हे करत असल्याने मंगळवारी रात्री दहा वाजे दरम्यान समता पतसंस्थेचे राहाता शाखेचे व्यवस्थापक मिलिंद बनकर यास शिर्डी पोलिसांनी अटक करून बुधवारी राहाता न्यायालयात हजर केले . राहाता न्यायालयाने बनकर यास ७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

राहाता शाखेतील समता नागरी पतसंस्थेत व्यवस्थापक मिलिंद बनकर यांनी एकाच दिवशी जवळपास १०८ व्यक्तींचे बँक खाते उघडून नॉमिनी म्हणून अशोक खरात यांचे नाव लावले तसेच ज्या खातेदारांचे खाते उघडले त्यांना कुठल्याही प्रकारची माहिती नसताना अशोक खरात याने त्यांच्या खात्यावर कोट्यावधी रुपयांच व्यवहार केले हे खातेदारांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या गुन्ह्यात अशोक खरात याला सध्या शिर्डी पोलीस ठाण्यात हजर करून त्याला ताब्यात ठेवले आहे. शाखा व्यवस्थापक यांनी कुणाच्या सांगण्यावरून एकाच दिवशी एवढे खाते उघडले याचा तपास आता पोलीस करत आहे. याबरोबरच इतर बँकेमध्ये देखील अशा प्रकारचे खाते उघडण्यात आल्याची चर्चा असल्याने त्या बँक शाखा व्यवस्थापकांची देखील या प्रकरणामुळे धांदल उडाली असल्याचे बोलले जात आहे.

# घाटीच्या शरीररचनाशास्त्र विभागाला वर्षातील 29 वे देहदान

## वैद्यकीय शिक्षणासाठी मोलाचे योगदान; सामाजिक संस्थांच्या जनजागृतीमुळे देहदान चळवळीला बळ

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाला गुरुवारी आणखी एक देहदान प्राप्त झाले. यामुळे चालू वर्षात विभागाला मिळालेल्या देहदानांची संख्या २९ वर पोहोचली असून, देहदानाबाबत वाढती जनजागृती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक संस्थांच्या सक्रिय सहभागाचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

यावेळी कै. सौ. अलका संजीव शिंदे (वय ५८, रा. तारांगण, नाशिक रोड, पडेगाव) यांच्या पार्थिवाचे त्यांच्या इच्छेनुसार कुटुंबीयांनी देहदान केले. या देहदानामुळे वैद्यकीय



शिक्षण, संशोधन तसेच भावी डॉक्टरांच्या प्रशिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळणार आहे.

हे देहदान जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान यांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आले. संस्थानाचे जिल्हाप्रमुख भरकड यांनी या प्रक्रियेसाठी विशेष समन्वय साधला. आजपर्यंत या संस्थानाच्या माध्यमातून शरीररचनाशास्त्र विभागाला चार देहदान प्राप्त झाली आहेत. तसेच स्नेहसावली संस्थेच्या माध्यमातून चालू वर्षात दोन देहदान प्राप्त झाली आहेत.

शरीररचनाशास्त्र विभागाकडून आस्था फाउंडेशन, मातोश्री, स्नेहसावली, विविध समाजसेवी संस्था, वृद्धाश्रम, स्वयंसेवी संघटना आणि इतर सामाजिक व्यासपीठांवर देहदानाविषयी जनजागृती व्याख्याने, मार्गदर्शन शिबिरे आणि प्रबोधनपर उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शरीररचनाशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या नेतृत्वाखाली देहदान जनजागृतीचे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

दरम्यान, आजच्या देहदानाची सर्व वैधानिक व विभागीय प्रक्रिया अत्यंत संवेदनशीलतेने आणि नियमानुसार पूर्ण करण्यात आली. या प्रक्रियेत सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण तसेच विभागातील खिल्लारे, मार्टिन, मिर्झा बेग आणि इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एआय प्लस स्मार्टफोन्सकडून ₹100 कोटी गुंतवणुकीचे वचन

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय स्मार्टफोन क्षेत्रात एक क्रांतिकारी पाऊल टाकत, एआय प्लस स्मार्टफोन्सने 'प्रोजेक्ट ट्रस्ट प्लस' हा एक धाडसी उपक्रम सुरू केला आहे, ज्याचा उद्देश दीर्घकालीन सामुदायिक सहभागातून देशातील सर्वात सुरक्षित स्मार्टफोन इकोसिस्टम तयार करणे आहे. कंपनी आपल्या उपकरणांची सुरक्षा वाढवण्यासाठी आणि त्यांच्यावर विश्वास निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञान आणि डेव्हलपर समुदायाला सहभागी करून घेण्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी दरवर्षी ₹२० कोटी (एकूण ₹१०० कोटी) गुंतवणूक करण्याचे वचन देत आहे.या उपक्रमाद्वारे, कंपनी स्वतंत्र संशोधकांना सक्रियपणे त्यांच्या प्रणालींची चाचणी घेण्यासाठी, त्यांच्या सुरक्षा रचनेला आव्हान देण्यासाठी आणि ग्राहकांवर परिणाम होण्यापूर्वीच दुरुस्त करता येतील अशा त्रुटी शोधण्यासाठी आमंत्रित करत आहे.प्रोजेक्ट ट्रस्ट प्लस' या तत्त्वज्ञानावर आधारित आहे की सुरक्षा हे अंतिम ध्येय नसून, तो एक सतत चालणारा प्रवास आहे. डिजिटल जग जसजसे अधिक जोडले जात आहे, तसतसे सुरक्षित स्मार्टफोन तयार करण्यासाठी सहयोग, पारदर्शकता आणि सक्रिय सामुदायिक सहभाग आवश्यक आहे, यावर एआय प्लस भर देते.

# प्रीमियम टीव्ही पोर्टफोलिओचा केला विस्तार

**नवी दिल्ली :** एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने आज आपल्या 2026 एआय टीव्ही लाईनअपची घोषणा केली आहे, ज्यामध्ये अल्ट्रा-लार्ज स्क्रीन आणि मिनी एलईडी तंत्रज्ञानाला त्यांच्या प्रीमियम टेलिव्हिजन रणनीतीच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. यामध्ये 292 सेमी (115-इंच) चे फ्लॅगशिप मॉडेल समाविष्ट आहे, जी एलजीने भारतीय बाजारपेठेत आतापर्यंत सादर केलेली सर्वात मोठी मिनी एलईडी स्क्रीन आहे.एलजीच्या 2026 टीव्ही रेंजमध्ये चार डिस्प्ले तंत्रज्ञानांतर्गत - क्यूएनईडी इव्हो मिनी एलईडी, ओएलईडी इव्हो, मायक्रो आरजीबी इव्हो / मिनी आरजीबी इव्हो आणि नॅनो 4K यूएचडी अंतर्गत 25 अल्ट्रा-लार्ज (190 सेमी (75-इंच) आणि त्याहून अधिक) मॉडेल्सचा समावेश आहे.

# पोको एम 8 पॉवर लाँच

**बेंगळुरू :** पोकोने आज विनाव्यत्यय मनोरंजनाला नव्या उंचीवर नेण्यासाठी डिझाइन केलेला पोको एम8 पॉवर स्मार्टफोन लाँच केला. पॉवर युअर बिंज या संकल्पनेवर आधारित, पोको एम 8 पॉवरमध्ये उद्योगातील आघाडीची ८००० एमएएच सिलिकॉन-कार्बन बॅटरी आणि आकर्षक १२० हर्ट्झ एएमओएलईडी डिस्प्ले आहे, ज्यामुळे वापरकर्ते कोणत्याही अडथळ्याविना अधिक काळ स्ट्रीमिंग, स्क्रोलिंग, गेमिंगचा आनंद घेऊ शकतात आणि कनेक्टेड राहू शकतात. स्मार्टफोन मनोरंजन, कंटेंट निर्मिती आणि दैनंदिन संवादासाठी प्राथमिक स्क्रीन बनत असल्याने, पोको एम8 पॉवर आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत राहण्यासाठी डिझाइन केला आहे.

# 'प्रोजेक्ट ट्रस्ट प्लस ' हा उपक्रम सुरु

**मुंबई:** एआय प्लस स्मार्टफोन्सने 'प्रोजेक्ट ट्रस्ट प्लस ' हा उपक्रम सुरू करत पुढील पाच वर्षांत स्मार्टफोन सुरक्षा मजबूत करण्यासाठी एकूण ₹१०० कोटींची गुंतवणूक जाहीर केली आहे. या उपक्रमांतर्गत एथिकल हॅकर्स, सुरक्षा संशोधक आणि डेव्हलपर्सना कंपनीच्या प्रणालीतील त्रुटी शोधून सुरक्षित इकोसिस्टम तयार करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कंपनीचे सीईओ माधव शेठ यांनी विश्वास हा पारदर्शकता आणि सामुदायिक सहभागातूनच निर्माण होतो, असे सांगितले. '

# आचार्यश्री 108 हेमसागरजी गुरुदेव यांच्या 47 व्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवाला भक्तिमय प्रारंभ



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सिद्धांत चक्रवर्ती आचार्यश्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७ व्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवाचा शुभारंभ अत्यंत भक्तिमय वातावरणात झाला. कार्यक्रमाची सुरुवात भगवान जिनेंद्रांच्या अभिषेकाने व तपस्वी सम्राट आचार्य १०८ सन्मतीसागरजी महाराज यांच्या पूजन-विधानाने झाली. त्यानंतर आचार्यश्री हेमसागरजी गुरुदेव यांचे मंगल आगमन होताच भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

प्रवचनात आचार्यश्रींनी चातुर्मास हा आत्मशुद्धी, संयम, तप, स्वाध्याय आणि धर्मसाधनेचा सुवर्णकाळ असल्याचे सांगत क्रोध, मान, माया व लोभाचा त्याग करून नवकार मंत्र, सामायिक, प्रतिक्रमण व गुरुवचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी केले.

महिला मंडळ, बहू मंडळ तसेच बालकांच्या सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. शैलेश व वैशाली पहाडे यांनी भजन व सूत्रसंचालन केले. कलशस्थापनेनंतर शैलेन्द्र अभिषेक, राजेश सेठी व प्रणय सेठी परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. विविध मंगल कलशांचा लाभ पूनमचंद विजयकुमार जैन अग्रवाल, दिनेश-निता सेठी परिवार, नितीन चूडीवाल, किर्ती अजमेरा, सुभाषचंद बोहरा, महावीर-राजेंद्र सेठी तसेच पापडीवाल परिवारासह अनेक गुरुभक्तांनी घेतला.

## एमजीएममध्ये स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेसच्या दीक्षारंभ कार्यक्रमास प्रारंभ

# 'पदवीसोबत व्यक्तिमत्त्व विकास, संशोधन आणि जबाबदार नागरिकत्वही तितकेच महत्त्वाचे' – श्रीकांत येरूळे





तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेसमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाला उत्साहात सुरुवात झाली. कार्यक्रमात विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांनी 'एज्युकेशन बियॉन्ड अ डिग्री : बिल्डिंग रिस्पॉन्सिबल सिटिझन्स अँड बेटर ह्यूमन बीइंग्स' या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न होता जबाबदार नागरिक आणि सक्षम व्यक्तिमत्त्व घडविण्याचे आवाहन केले.

यावेळी विभागप्रमुख डॉ. मोईनुद्दीन सिद्दीकी, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, विभागप्रमुख डॉ. प्रफुल्ल शिंदे, डॉ. क्रांती झाकडे, डॉ. आशा डागर, डॉ. उत्तरा देशमुख, डॉ. सूर्यकांत सपकाळ, प्रा. कणिका अरोरा, डॉ. प्रणय दिवटे, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना श्रीकांत येरूळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक आहे. पदवीबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), नेतृत्वगुण आणि अभ्यासक्रमाबाहेरील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास करिअर अधिक सक्षम होते.

सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करण्याचा सल्ला देताना त्यांनी इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या मनोरंजनप्रधान माध्यमांपेक्षा लिंक्डइनसारख्या व्यावसायिक माध्यमांचा अधिक वापर करण्याचे आवाहन केले. तसेच व्यायाम, योग, प्राणायाम, नियमित वाचन आणि सातत्य या सवयी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. "पदवी सर्वांनाच मिळते; मात्र वेगळे व्यक्तिमत्त्व स्वतःच्या प्रयत्नातूनच घडते," असेही त्यांनी नमूद केले.

येरूळे यांनी विद्यार्थ्यांना जबाबदार भारतीय नागरिक बनण्याचे आवाहन करत वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, मतदानाचा हक्क बजावणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, स्वच्छता राखणे, कुठेही न थुंकणे आणि कायद्याचा आदर करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले. भारतीय संविधान समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित असल्याची आठवण करून देत त्यांनी जीवनात पैसा आणि प्रतिष्ठेबरोबरच समाधानही महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

# स्वर स्वामी कला साधना आयोजित 'कराओके "कहा से आये बदरा" संगीत मैफलीला आणि दुसऱ्या वर्धापन दिनाला रसिकांचा प्रतिसाद

संगीत ही माणसाच्या भावना व्यक्त करणारी सर्वात प्रभावी कला आहे. सुरांच्या माध्यमातून माणसे एकमेकांशी जोडली जातात आणि समाजात सांस्कृतिक ऐक्य अधिक दृढ होते. अशाच संगीतप्रेमाची जपणूक करणाऱ्या 'स्वर स्वामी कला साधना' या संस्थेने आपल्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'कराओके कहा से आये बदरा' या भव्य संगीत मैफलीला रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम हाऊसफुल केला.

शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी चेंबूर येथील छेडानगर जिमखाना येथे झालेल्या या सुरेल कार्यक्रमाने उपस्थित संगीतप्रेमींना अविस्मरणीय आनंदाची अनुभूती दिली. स्वर स्वामी कला साधना हा ग्रुप आज गायक-गायिकांसाठी जणू एक 'गानपंढरी' बनला आहे. नवोदित आणि अनुभवी कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी या संस्थेने नेहमीच व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. सातत्यपूर्ण रियाज, मेहनत आणि संगीतावरील निस्सीम प्रेम यांच्या बळावर अनेक कलाकार या मंचावरून घडले असून आज ते रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.

या कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या गायक-गायिकांनी आपल्या सुरेल आवाजाची जादू उलगडली. प्रत्येक कलाकाराने जुन्या-नव्या हिंदी आणि मराठी गीतांचे अप्रतिम सादरीकरण करून श्रोत्यांची मने जिंकली. प्रत्येक गीतानंतर सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. काही गाण्यांदरम्यान रसिकांनी कलाकारांसोबत गुणगुणत कार्यक्रमात अधिक रंगत आणली.

संगीताची खरी ताकद म्हणजे ते प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करते. या कार्यक्रमातही प्रत्येक सादरीकरणात भाव, सुर, ताल आणि शब्दांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळाला. त्यामुळे संपूर्ण सभागृहात एका वेगळ्याच संगीतमय वातावरणाची निर्मिती झाली होती. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आणि आयोजन सौरभजी, गणेशजी, प्रियंकाजी आणि हितचिंतक राजेश हुनारी यांनी अत्यंत मेहनतीने केले. कार्यक्रमाच्या प्रत्येक बाबीचे नियोजन इतके सुंदर होते की, उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मै अलबेला ग्रुपचे सर्वेसर्वा श्री. संजय तावरे व श्रीमती किरण तावरे, दूरदर्शन कलाकार श्री. दीपक गोईल तसेच अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा आणखी वाढली. मान्यवरांनी कलाकारांच्या



सादरीकरणाचे भरभरून कौतुक करत अशा सांस्कृतिक उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे मत व्यक्त केले.

विशेष म्हणजे, या कार्यक्रमाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये दडलेल्या सुप्त कलागुणांना एक प्रभावी व्यासपीठ मिळवून दिले. दैनंदिन कामाच्या व्यापातून वेळ काढून कलाकारांनी केलेला रियाज आणि सादरीकरण पाहून प्रेक्षक भारावून गेले. अनेक कलाकारांच्या आवाजाने महान गायकांच्या आठवणी जाग्या झाल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी बनसोडे यांनी अत्यंत प्रभावी, ओघवत्या आणि रसाळ शैलीत केले. त्यांच्या खुमासदार निवेदनामुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत प्राप्त झाली. कार्यक्रमाचे छायाचित्रण चरण सर यांनी उत्कृष्टरीत्या केले, तर ध्वनीव्यवस्थेची जबाबदारी प्रदीप सावर्डेकर यांनी समर्थपणे सांभाळून प्रत्येक स्वर श्रोत्यांपर्यंत स्पष्टपणे पोहोचवला.

या कार्यक्रमाला आणखी एक विशेष भावनिक पैलू लाभला.

३१ जुलै हा हिंदी चित्रपटसृष्टीतील महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांचा स्मृतिदिन. त्यांच्या स्मृतिदिनानंतरच्या दुसऱ्याच दिवशी आयोजित करण्यात आलेली ही संगीत मैफल म्हणजे स्वरसम्राट मोहम्मद रफी यांना अर्पण केलेली सुरेल मानवंदनाच होती. त्यांच्या अजरामर गीतांच्या आठवणींनी कार्यक्रमात एक वेगळाच भावनिक रंग भरला.

रसिक प्रेक्षकांनी संपूर्ण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या गायनाचे भरभरून कौतुक केले. अशा दर्जेदार संगीत मैफलींचे आयोजन सातत्याने व्हावे आणि नवोदित कलाकारांना अधिकाधिक संधी मिळावी, अशी अपेक्षाही अनेकांनी व्यक्त केली. 'कराओके कहा से आये बदरा' ही मैफल केवळ गाण्यांचा कार्यक्रम नव्हती, तर मैत्री, सांस्कृतिक जिव्हाळा, कलावंतांचा सन्मान आणि संगीतप्रेम यांचा अविस्मरणीय उत्सव ठरली. संगीताच्या सुरेल धाग्यांनी कलाकार आणि रसिक यांना एकत्र बांधत या कार्यक्रमाने प्रत्येकाच्या मनात कायमस्वरूपी स्थान निर्माण केले.

बालकलाकार - *प्रवज्ञा दिपक साळवे*

हिने आपल्या सुरमधुर आवाजाने हिंदी गाण्याचे सादरीकरण करून रसिक प्रेक्षकांना खुश केले.

कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व गायक-गायिका, मान्यवर पाहुणे, स्वयंसेवक, तांत्रिक सहकारी आणि उपस्थित रसिक प्रेक्षकांचे मनःपूर्वक आभार मानले. स्वर स्वामी कला साधना या संस्थेचा हा उपक्रम भविष्यातही अशाच दर्जेदार आणि अविस्मरणीय संगीत मैफलींची परंपरा अधिक जोमाने पुढे नेईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिलं एम.ए. क. ५१८/२०२६

अर्जदार :- १) तान्हावाई भ्र. लक्ष्मणसिंग राजपुत वय ७० वर्षे धंदा गृहिणी, रा. नुतन कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जिं. छत्रपती संभाजीनगर २) विजयसिंग लक्ष्मणसिंग राजपुत वय ४४ वर्षे धंदा शेती रा. नुतन कॉलनी गंगापुर ताः गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. निर्मला विरसिंग राजपुत, वय ४८ वर्षे धंदा गृहिणी रा. परदेशीपुरा गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त 'विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी दारुंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे लक्ष्मणसिंग बन्सीसिंग राजपुत हे नुतन कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक २९/०६/२०२६ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयताचे आईवडील हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत लक्ष्मणसिंग बन्सीसिंग राजपुत यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत लक्ष्मणसिंग बन्सीसिंग राजपुत यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयतांचे मृत्युपश्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामांसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मां. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतर आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कातं त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ११/०९/२०२६ रोजीची आहे.

आदेशावरून

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख

# नियोजनाचा दुष्काळ आणि शेती

राज्यात पावसाळा सुरू झाला की एकाच वेळी दोन वेगवेगळी चित्रे दिसू लागतात. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत नद्या दुथडी भरून वाहतात, धरणे भरू लागतात, तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेले असतात. कुठे अतिवृष्टी, कुठे अल्पवृष्टी आणि कुठे पावसाचा लपंडाव. ही परिस्थिती काही आजची नाही; ती गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांचे जगणे कठीण करते आहे. या सगळ्यात एक प्रश्न मात्र दरवर्षी अनुत्तरित राहतो आणि तो म्हणजे आपण पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे खरोखर नियोजन करतो का? पाऊस आपल्या हातात नाही; पण पडलेले पाणी कसे अडवायचे, कसे जिरवायचे आणि वर्षभरासाठी कसे वापरायचे, हे नक्कीच आपल्या हातात आहे. पण, आपली टंचाईची चर्चा मोसमी असते. पाऊस आला की सारे मागे पडते. धरणं कोरडी पडू लागली, विहिरींची पातळी खाली गेली आणि टँकर सुरू झाले की, आपल्याला पाणी आठवते. प्रत्यक्षात सिंचनाचे नियोजन उन्हाळ्यात नव्हे, तर पावसाळ्यातच व्हायला हवे.

यंदाच्या खरीप हंगामात काही भागांत पावसाने दमदार हजेरी लावली, तर काही ठिकाणी पेरणीनंतर दीर्घ खंड पडल्याने पिके हातातून जाताना दिसत आहेत. काही जिल्ह्यांत इतका पाऊस झाला आहे, की शेतात पाणी साचून उभ्या पिकांचे नुकसान झाले. या दोन टोकांच्या परिस्थितीत सर्वाधिक भरडला जातो तो शेतकरी. त्याचे ना हवामानावर नियंत्रण आहे, ना बाजारभावावर. शेती हा आजही निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. विकसित कृषी व्यवस्था असलेल्या देशांनी निसर्गावरील हे अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी केले आहे. सिंचन, जलसंधारण, तंत्रज्ञान, हवामानाचा अचूक अंदाज आणि बाजारव्यवस्थेतील सुधारणांच्या आधारे त्यांनी शेती अधिक समृद्ध आणि सुरक्षित केली. आपल्याकडे मात्र पाऊस आला तरी चिंता आणि पाऊस नाही आला तरी चिंता, अशीच परिस्थिती असते. मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांचा विचार केला तर ही समस्या अधिक गंभीर वाटते. या भागात अनेक मोठी धरणे आहेत, जलसंपत्तीही उपलब्ध आहे, पण त्या पाण्याचा लाभ शेतीपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही. कालवे अपूर्ण आहेत, अनेक सिंचन प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले आहेत, तर काही प्रकल्प पूर्ण झाले असले तरी त्यांची कार्यक्षमता अपेक्षेइतकी नाही. परिणामी, लाखो हेक्टर शेती अजूनही नैसर्गिक पावसावरच अवलंबून आहे. अनेक दशकांपासून सिंचन प्रकल्पांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च झाला. अनेक योजना जाहीर झाल्या, अनेक घोषणा झाल्या; पण शेवटी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी किती पोहोचले? हा खरा प्रश्न आहे. सिंचनाच्या अभावाचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो. पाऊस वेळेवर आला तर उत्पादन चांगले होते; पण त्यानंतर बाजारभाव कोसळतात. पाऊस कमी झाला तर उत्पादन घटते आणि खर्च वाढतो. म्हणजे कोणतीही परिस्थिती असो, संकट शेतकऱ्याच्याच वाट्याला येते.

आजच्या काळात हवामान बदल हा देखील शेतीसमोरील मोठे आव्हान आहे. पूर्वी पावसाचा एक ठरावीक क्रम होता. आता तो पूर्णपणे बदलला आहे. काही दिवस मुसळधार पाऊस, त्यानंतर अनेक दिवस खंड, पुन्हा अतिवृष्टीसारखा पाऊस हे सारे शेतीसाठी घातक ठरत आहे. त्यामुळे केवळ पारंपरिक शेती पद्धतीवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यासाठी पीकपद्धतीत बदल, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारावी लागेल. सूक्ष्म सिंचनाचा विस्तार ही काळाची गरज आहे. ठिबक आणि तुषार सिंचनामुळे पाण्याची मोठी बचत होते. कमी पाण्यात अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येते. अशा व्यवस्थेसाठी अनुदानाची प्रक्रिया सुलभ करणे आणि तंत्रज्ञान सहज उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. याचबरोबर जलसंधारणाच्या कामांकडे नव्याने पाहण्याची गरज आहे. गावागावांत ओढे, नाले, तलाव, शेततळी, बंधाऱ्यांचे जाळे मजबूत झाले तर पावसाचा प्रत्येक थेंब अडवता येईल. महाराष्ट्राने जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमधून सकारात्मक अनुभव घेतला आहे. अशा योजना बदल घडवू शकतात, हे सिद्धही झाले आहे. त्यामुळे सरकारने अशा योजनांना बळ देण्याची आवश्यकता आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा ही घोषणा केवळ घोषवाक्य न राहता ती लोकचळवळ बनली पाहिजे. शिवाय, शेतीचा प्रश्न फक्त पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित नाही. बाजारव्यवस्थेतील अनिश्चितता ही तितकीच गंभीर समस्या आहे. शेतकरी मोठ्या कष्टाने पीक घेतो; पण विक्रीच्या वेळी त्याला हमीभाव मिळेल, याची खात्री नसते. मध्यस्थांची साखळी, साठवणुकीचा अभाव आणि प्रक्रिया उद्योगांच्या कमतरतेमुळे शेतीतील नफा कमी होत जातो. त्यामुळे सिंचनाबरोबरच बाजारव्यवस्थेतील सुधारणांनाही समान महत्त्व द्यावे लागेल. ते सरकारच करू शकते.

आज गरज आहे ती कृषी धोरणाकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची. पाऊस, सिंचन, वीज, बाजार, तंत्रज्ञान, विमा आणि प्रक्रिया उद्योग हे सर्व घटक परस्परांशी जोडलेले आहेत. एका घटकाकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या घटकात सुधारणा करून चालणार नाही. मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी बहुतेकदा दुष्काळाशी लढत असतो, तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी अनेकदा अतिवृष्टीशी झुंज देतो. या दोन्ही परिस्थितींचा विचार करून प्रदेशनिहाय जलव्यवस्थापन धोरण तयार करायला हवे. प्रत्येक भागासाठी एकच उपाय लागू होणार नाही. स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार सिंचन आणि जलसंधारणाची स्वतंत्र योजना आवश्यक आहे. शेतकरी आजही आशावादी आहे. त्याच्या आशेला प्रतिसाद दिला पाहिजे. प्रत्येक वर्षी तो नव्या हंगामाची सुरुवात नव्या स्वप्नांसह करतो. कर्ज असो, नैसर्गिक संकट असो किंवा बाजारातील अनिश्चितता असो, तो पुन्हा उभा राहतो. हीच त्याची ताकद आहे. मात्र या आशावादाची सतत परीक्षा घेणे योग्य नाही.

शहरीकरणाचा कितीही गाजावाजा केला तरी महाराष्ट्रातील पन्नास टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे महाराष्ट्रासमोरचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे पावसाचे व्यवस्थापन. पाऊस कमी नाही; त्याचे नियोजन कमी आहे. एका बाजूला समुद्रात वाहून जाणारे अब्जावधी घनमीटर पाणी आणि दुसऱ्या बाजूला टँकरवर अवलंबून असलेली गावे, ही विसंगती दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही. शेतीकडे केवळ उत्पादनाचे साधन म्हणून न पाहता, ती अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ आहे, या दृष्टीने विचार करण्याची वेळ आली आहे. पाऊस हा निसर्गाच्या हातात असला, तरी पाण्याचे नियोजन आणि शेतीचे भविष्य हे पूर्णपणे आपल्या हातात आहे. जर आजही सिंचन, जलव्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर दरवर्षी पावसावर चर्चा होईल, दुष्काळावर चर्चा होईल, नुकसानभरपाईवर चर्चा होईल; पण शेतकऱ्यांच्या आयुष्यातील अनिश्चितता मात्र कायम राहील. महाराष्ट्राच्या विकासाचा मार्ग शेतीतूनच जातो. शेती सक्षम करायची असेल, तर पाऊस, सिंचन आणि बाजार या तिन्ही घटकांचे सुयोग्य नियोजन अपरिहार्य आहे. शेतकऱ्याच्या घामाला न्याय मिळाला, तरच महाराष्ट्राची समृद्धी टिकून राहील. अन्यथा, पाऊस पडत राहील, धरणे भरत राहतील, घोषणा होत राहतील; पण शेतकऱ्याच्या डोळ्यांतील प्रतीक्षेचा दुष्काळ कधीच संपणार नाही. परिणामी, महाराष्ट्राचे अर्थकारण कायम एका मर्यादेत बांधलेले राहील. कारण ते पुढे नेण्याची क्षमता फक्त शेतीत आहे आणि शेती हा विषय केवळ अतिवृष्टी किंवा अल्पवृष्टी नव्हे तर नियोजनाच्या दुष्काळाचाही कायम बळी राहिलेला आहे. ■

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# शिपबिल्डिंग क्लस्टर काय साधणार?

भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय निश्चित केले आहे. या प्रवासात उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा, संरक्षण उद्योग, निर्यात आणि सागरी अर्थव्यवस्था यांना विशेष महत्त्व दिले जात आहे. अशा वेळी शासनाने घेतलेला महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील दिघी येथे सुमारे २० हजार कोटी रुपयांचा 'ग्रीनफिल्ड शिपबिल्डिंग क्लस्टर' उभारण्याचा निर्णय हा केवळ आणखी एक औद्योगिक प्रकल्प नाही, तर भारताच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. एके काळी व्यापार, नौकानयन आणि समुद्री दळणवळणासाठी प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्राच्या किनारपट्टीला पुन्हा जागतिक औद्योगिक नकाशावर स्थान मिळवून देण्याची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. भारतात जवळपास साडेसात हजार किलोमीटरची किनारपट्टी आहे. त्यापैकी महाराष्ट्राचा सुमारे ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा हा देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक महत्त्वाच्या किनारपट्ट्यांपैकी एक मानला जातो. मुंबई, जवाहरलाल नेहरू बंदर, दिघी, रेवदंडा, दाभोळ, जयगड यासारखी बंदरे राज्याच्या सागरी अर्थव्यवस्थेचा कणा आहेत; मात्र एवढी मोठी किनारपट्टी असूनही जहाजबांधणी उद्योगात भारताचे स्थान आजही अपेक्षेइतके मजबूत नाही.

आज जगातील सुमारे ९० टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार समुद्रमार्गे होतो. त्यामुळे जहाजांची मागणी सातत्याने वाढत आहे. मालवाहू जहाजे, कंटेनर वाहतूक, एलएनजी जहाजे, संरक्षण क्षेत्रातील युद्धनौका, ऑफशोअर ऊर्जा प्रकल्पांसाठी लागणारी विशेष जहाजे आणि दुरुस्ती उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. भारताने या क्षेत्रात स्वतःची मजबूत उपस्थिती निर्माण केल्यास त्याचा थेट फायदा देशाच्या निर्यातीला, रोजगाराला आणि औद्योगिक विकासाला होणार आहे. दिघीची निवडदेखील अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील हे ठिकाण खोल पाण्याच्या किनाऱ्यामुळे, विद्यमान बंदर सुविधांमुळे आणि मुंबई तसेच जवाहरलाल नेहरू बंदराशी असलेल्या सुलभ संपर्कामुळे उद्योगासाठी अनुकूल मानले जाते. दक्षिणेला असलेले दिघी बंदर आणि भविष्यात विकसित होणाऱ्या सागरी पायाभूत सुविधांमुळे या परिसरात जागतिक दर्जाचे जहाजबांधणी केंद्र विकसित होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकार आणि मुंबई पोर्ट प्राधिकरणाने संयुक्त विशेष उद्देश संस्था स्थापन करून या प्रकल्पाची पायाभरणी सुरू केली आहे. केंद्र सरकारच्या जहाजबांधणी विकास योजनेंतर्गत या क्लस्टरला मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळणार असल्याने अंमलबजावणीला गती मिळण्याची अपेक्षा आहे. येथे केवळ जहाजबांधणीच होणार नाही, तर संपूर्ण औद्योगिक परिसंस्था विकसित केली जाणार आहे.



जगभरातील यशस्वी 'शिपबिल्डिंग क्लस्टर'ची ताकद अशाच पूरक उद्योगांच्या साखळीत असते. त्यामुळे एका मोठ्या जहाजबांधणी प्रकल्प उभारणीपेक्षा हा संपूर्ण औद्योगिक शहर उभारण्याचा प्रयत्न आहे. या प्रकल्पासाठी देशातील सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य अशा 'माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड' या जहाजबांधणी कंपनीला अँकर शिपयार्ड म्हणून सहभागी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. संरक्षण क्षेत्रातील युद्धनौका, पाणबुड्या आणि अत्याधुनिक जहाजबांधणीचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या या संस्थेच्या सहभागामुळे प्रकल्पाला तांत्रिक विश्वासार्हता मिळू शकते. त्याचबरोबर खाजगी गुंतवणूकदारांनाही या प्रकल्पाकडे आकर्षित करण्यास मदत होईल. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागातून उभा राहणारा हा प्रकल्प भारताच्या औद्योगिक विकासाच्या नव्या मॉडेलचे उदाहरण ठरू शकतो. रोजगाराच्या दृष्टीने पाहिले असता या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित होते. जहाजबांधणी हा अत्यंत श्रमप्रधान उद्योग आहे. अभियंते, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, डिझाईन तज्ज्ञ, मरीन इंजिनीअर, मशीन ऑपरेटर, लॉजिस्टिक व्यवस्थापक, गुणवत्ता नियंत्रण तज्ज्ञ, संशोधक आणि हजारो कुशल-अकुशल कामगार यांना या उद्योगातून मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू शकतो. त्याशिवाय वाहतूक, हॉटेल, निवास, शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण संस्था आणि लघुउद्योगांनाही मोठी चालना मिळेल.

कोकणाचा समुद्रकिनारा हा पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील प्रदेश आहे. येथे मॅन्ग्रोव्ह, खाड्या, मासेमारी, जैवविविधता आणि किनारी परिसंस्था यांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन, भराव, ड्रेजिंग आणि औद्योगिक विकासामुळे पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विकास आणि पर्यावरणातील संतुलन राखणे ही या प्रकल्पाची सर्वांत मोठी कसोटी असेल. पर्यावरणीय मंजुरी ही केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता वैज्ञानिक मूल्यांकनावर आधारित असावी. स्थानिक नागरिक, मासेमार आणि पर्यावरण तज्ज्ञ यांचा विश्वास संपादन करणेही तितकेच महत्त्वाचे ठरेल. कोकणातील अनेक मोठ्या प्रकल्पांना स्थानिकांचा विरोध झाल्याची उदाहरणे महाराष्ट्राने यापूर्वी पाहिली आहेत. त्यामुळे या प्रकल्पात पारदर्शकता, योग्य पुनर्वसन, स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य आणि सामाजिक विकासाची हमी या बाबींची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल. उद्योग उभा राहताना स्थानिक समाजाचा सहभाग आणि विश्वास टिकवणे हेच प्रकल्पाच्या दीर्घकालीन यशाचे गमक ठरेल. भारताला जहाजबांधणी क्षेत्रात मोठी झेप घ्यायची असेल, तर केवळ बंदरे उभारून चालणार नाही. संशोधन, तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि जागतिक दर्जाचे उत्पादन यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. हरित इंधनावर चालणारी जहाजे, डिजिटल डिझाईन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कार्बन उत्सर्जन कमी करणारी जहाजे ही भविष्यातील गरज आहे.

दिघीतील 'शिपिंग क्लस्टर' या नव्या तंत्रज्ञानाचे केंद्र बनले, तर भारताला जागतिक स्पर्धेत वेगळी ओळख निर्माण करता येईल. याचबरोबर हा प्रकल्प भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठीही महत्त्वाचा आहे. हिंद महासागर परिसरातील वाढती भूराजकीय स्पर्धा, सागरी सुरक्षा आणि नौदलाची वाढती गरज लक्षात घेता देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता वाढवणे ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज बनली आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी उत्पादनाला चालना देण्याच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेलाही या प्रकल्पामुळे बळ मिळेल. केंद्र सरकारने २०३७ पर्यंत भारताची जहाजबांधणी क्षमता तब्बल चाळीसपट वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे लक्ष्य महत्त्वाकांक्षी असले, तरी अशा मोठ्या क्लस्टरच्या माध्यमातून ते साध्य करण्याचा मार्ग नक्कीच खुला होऊ शकतो, मात्र यासाठी प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, प्रशासकीय निर्णय जलद घेतले जाणे, आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील अनेक मोठे प्रकल्प विलंब, मंजुरीतील अडथळे आणि खर्चवाढीमुळे रखडल्याची उदाहरणे आहेत. दिघीच्या 'शिपिंग क्लस्टर' प्रकल्पाबाबत अशी पुनरावृत्ती होऊ नये, हीच अपेक्षा. दिघीतील 'मेगा शिपबिल्डिंग क्लस्टर' हा केवळ रायगड किंवा महाराष्ट्राचा प्रकल्प नाही, तर भारताच्या सागरी भवितव्याशी जोडलेला राष्ट्रीय महत्त्वाचा उपक्रम आहे. योग्य नियोजन, पर्यावरणीय जबाबदारी, तांत्रिक उत्कृष्टता आणि पारदर्शक अंमलबजावणी यांचा समतोल साधता आला, तर हा प्रकल्प महाराष्ट्राला सागरी उद्योगाचे जागतिक केंद्र बनवू शकतो. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# 'झेडपी'च्या शाळा आणि शिक्षणाचे 'दुबळी'करण

आम्ही पिढी घडवायला चाललोय... मग त्यासाठी ज्या गोष्टी होणे आवश्यक आहे, त्याचे काय? नुसती इच्छा असून पिढी घडणार नाही, तर त्यासाठी व्यवस्थाही उभारली जाणे गरजेचे आहे. आता शिक्षणातून पिढी घडते, असा जो आमचा समज आहे, मग तीच व्यवस्था दुबळी असेल तर घडणारी पिढीही दुबळीच असेल ना! जिल्हा परिषदांच्या शाळांची अवस्था तर 'दीनदुबळी' झाली आहे. जी शाळा देशपातळीवर कर्तृत्वाच्या भरवशावर गाजली, आज त्याच विद्यार्थ्यांच्या नशिबात शिक्षकासाठी रस्त्यावर उतरणे असेल तर शिक्षणासाठी ही विस्कटलेलीच 'घडी' आहे.

शिक्षणातून खरंच स्वयंपूर्ण, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडते का? हा विषय चर्चेत आला तर नक्कीच अनेक मतमतांतरे पुढे येतील. आज शिक्षणाचे होत असलेले बाजारीकरण, केवळ औपचारिकता म्हणून शिक्षकांकडून केले जाणारे अध्यापन, वास्तविकतेपासून कोसो दूर असलेली शिकविण्याची पद्धत अशा अनेक गोष्टींमुळे आज शिक्षण केवळ कागदावर टक्केवारीचा आकडा फुगविण्यासाठी उभी असलेली व्यवस्था असेच भासू लागले आहे. शिक्षणात व्यापार आला. खाजगी शाळांचा भडिमार, त्यांची झगमगाट पालक आणि विद्यार्थ्यांचे डोळे दिपवू लागली आहे. अशा टोलेजंग इमारतींमध्ये भरणाऱ्या शाळांमध्ये ज्ञानाची गंगा किती प्रभावीपणे प्रवाहित होते, हा प्रश्नच आहे. परंतु ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने शिक्षणाचे बळकटीकरण करण्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा परिषदांच्या शाळांचे काय? कधीकाळी याच शाळा ग्रामीण भागासाठी ज्ञानदानाचे प्रभावी आणि आश्वासक माध्यम होते. लोकांचा प्रचंड विश्वास जिल्हा परिषदेच्या शाळांवर होता. पण आज तो ढळला आहे. नवनवीन तंत्रज्ञान आले. शिक्षणावर होणारा खर्च वाढला, पण शिक्षणाचा दर्जा घसरला. जिल्हा परिषदांच्या शाळांच्या उंबरठ्याला वाकुल्या दाखवत खाजगी शाळांची वाहने गावातील विद्यार्थ्यांना कित्येक अंतर दूर डोहारून नेतात. काही प्रतिभावंत शिक्षक आजही जिल्हा परिषदेच्या शाळांची महती टिकविण्यासाठी धडपडतात, पण त्यांना व्यवस्थेची साथ मिळत नाही.

तुमसर तालुक्यातील सोरना येथील बंद पडण्याच्या अवस्थेत आलेल्या शाळेला जिवंत ठेवण्यासाठी २०१८ मध्ये दोन शिक्षकांनी आपले सर्वस्व पणाला लावले. त्याचे फलित शाळा देशपातळीवर नावारूपास आली. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत राज्यात पहिली आली. पण झाले काय? तर आता त्या शाळेत एकही शिक्षक नाही. एकाची बदली आणि एक सेवानिवृत्त झाल्याने जर आज या शाळेचे विद्यार्थी जिल्हा परिषद कार्यालयात शाळा भरवून शिक्षक द्या म्हणत असतील तर हा शिक्षण व्यवस्थेला दाखविलेला आरसा आहे. जी शाळा कधी स्तुत्य उपक्रम, चांगल्या शिक्षणासाठी आणि मुले घडविण्यासाठी ओळखली जात होती, आज तेथील विद्यार्थ्यांचे आंदोलन चर्चेत आहे. राज्यात सोरना शाळेसारख्या अनेक शाळा आहेत. शिक्षकांचा अभाव हा अत्यंत कळीचा मुद्दा आहे. १५ हजार १५८ च्या आसपास शिक्षकांची पदे जिल्हा परिषदांच्या शाळेत रिक्त आहेत. एकट्या भंडारा जिल्ह्यात ८७६ पदे रिक्त आहेत. ५० शाळांमध्ये तर शिक्षकच नाहीत. आता अशा व्यवस्थेच्या जोरावर दर्जेदार शिक्षणाचे स्वप्न खरंच पूर्ण होऊ शकते का? आम्ही खाजगी शाळांच्या नावाने बोट मोडतो. या शाळा जिल्हा परिषदेच्या शाळांना मोडीत काढण्यास निघाल्या म्हणतो खरे, पण खरंच शाळांना मोडीत काढणारे कोण? याचा विचार व्हायला पाहिजे. शिक्षण क्षेत्रावर होणारा शासनाचा खर्च आणि त्या तुलनेत बाहेर पडणारे परिणाम जर सुसंगत नसतील तर आज उभा दिसत असलेला शिक्षणाचा डोलारा नेमका कशासाठी, असे विचार तर येणारच? शिक्षक नसल्याने शाळांची पर्यायाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता घसरणार, एक शिक्षकी शाळांमध्ये एकाच वर्गात ४ वर्गाचे विद्यार्थी बसून शिक्षण घेणार असतील तर त्याचा दर्जा, शिक्षकांवरील ताण आणि यातून या गोष्टींमुळे जिल्हा परिषद शाळांविषयी पालकांमध्ये निर्माण होणारा अविश्वास आज जिल्हा परिषदेच्या शिक्षण व्यवस्थेला लोकांपासून दूर नेण्यास कारणीभूत ठरत आहे. शिक्षक ही गरज आहे. तीच पूर्ण होत नसेल तर डिजिटल शाळा असे फलक लावून मिरवणे म्हणजे सगळा पोकळ वासाच म्हणावा लागेल. आज काही होतकरू शिक्षक ग्रामीण भागातील शासकीय शाळांवरील लोकांचा विश्वास दृढ करण्यासाठी प्रयोगशील होऊन वागत असताना व्यवस्थेकडे शासन, प्रशासनाचे असलेले दुर्लक्ष चिंतेचा विषय आहे. ■

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# नवनिधी-मारुतीरायांचा अद्भुत प्रसाद

आपण सर्व हनुमान चालीसा पठन करताना भगवान हनुमंतरायाचे वर्णन ''अष्टसिद्धी नव निधीचे दाता'' असे आहे. यातील अष्ट सिद्धी आणि नऊ निधी याबाबत सर्वांना कुतूहल असते. त्यातही सिद्धीबाबत आपण थोडेफार ऐकून आहोत पण आपल्यापैकी बहुतेकांना नवनिधीबाबत कल्पना नसते. त्या नवनिधीबाबत आज आपण चर्चा करू.

**निधी म्हणजे काय?**

'निधी' शब्द आपण पैसा, संपत्ती, खजिना, कोष या अर्थाने वापरतो. आमदार निधी, खासदार निधी हे पण आपण नेहमीच ऐकतो. कोषाध्यक्ष, खजिनदार म्हणजे निधीचा अधिकारी. आपल्या प्राचीन पुराण ग्रंथात देवांचे खजिनदार कुबेर आहेत. त्यांच्या खजिन्यातील निधी म्हणजे देवांचा कोष होय. कुबेराच्या खजिन्यात नऊ प्रकारचे निधी आहेत. त्याला नवनिधी म्हणतात. नवनिधीचे खजिनदार कुबेर असले तरी भगवान हनुमान या नवनिधीचे दाता आहेत.

त्या नवनिधी पुढीलप्रमाणे आहेत.

**पद्मो महापद्मश्च मकरः कच्छपस्तथा।**
**नीलो मुकुन्दः शंखश्च नन्दः खर्वश्च नौ निधी॥**

१) पद्म २) महापद्म ३) नील ४) मुकुंद ५) नंद ६) मकर ७) कच्छप ८) शंख ९) खर्व

याच नवनिधी सीतामाई आणि भगवान श्रीरामांनी महारुद्र हनुमंतांना दिल्या. याच नवनिधी भगवान मारुतीराय आपल्या भक्तांना प्रसन्न होऊन देतात. म्हणून त्यांना "नवनिधी के दाता'' म्हणतात.

निधी फक्त भौतिक ऐश्वर्य, धनसंपत्ती, पैसा यांच्याशी संबंधित असेल असे वाटणे साहजिक आहे. पण त्याचा गर्भितार्थ शोधला पाहिजे. आपल्या जीवनात या नवनिधी तीन प्रकारे ऐश्वर्य प्रदान करतात.

१) आत्मिक ऐश्वर्य २) बौद्धिक ऐश्वर्य ३) सांसारिक ऐश्वर्य.

कुबेराच्या खजिन्यात असलेल्या नवनिधी या तिन्ही प्रकारांत आहेत हे लक्षात घ्या.

समजा मारुतीराय प्रसन्न झाले तर सामान्य माणूस सांसारिक ऐश्वर्य देणारी नवनिधीतील निधी मागेल. मध्यम भक्त बौद्धिक ऐश्वर्य देणाऱ्या निधी मागतील तर उच्चकोटीचा भक्त आत्मिक ऐश्वर्य देणाऱ्या नवनिधीतील निधी मागेल. आत्मिक ऐश्वर्य महत्त्वाचे असते पण आपण मात्र सांसारिक सुखाची कामना करतो.

आपल्या संस्कृतीत आध्यात्मिक ऐश्वर्य, बौद्धिक ऐश्वर्य आणि ऐहिक ऐश्वर्य मानले जाते. त्यांनाच निधी म्हणतात.

नवनिधीतील कोणता निधी काय देतो, याचा विचार करू.

**१) पद्म निधी** : कुबेराच्या खजिन्यात असलेला हा निधी जर मारुतीरायांनी एखाद्या भक्ताला दिला तर या भक्ताजवळ सुवर्ण, रजतयुक्त धनसंपत्ती असेल. हा भक्त सद्गुणसंपन्न आणि सात्त्विक वृत्तीचा असेल. पद्म म्हणजे कमळ म्हणजे हा भक्त कमळाप्रमाणे सुंदर, शुद्ध आणि समृद्ध असेल. हा निधी ज्याच्याजवळ आहे त्याच्याजवळील संपत्ती पिढ्यानपिढ्या टिकते. हा माणूस दानशूर असतो.

**२) महापद्म निधी** : महापद्म म्हणजे विशाल कमळ. हा निधी ज्याला प्राप्त होतो ती व्यक्ती प्रचंड संपत्ती आणि विपुल रत्नसंपदायुक्त असते. या निधीचा माणूस सात्त्विक, लक्ष्मीपुत्र आणि रत्न, माणिक, मोती हिरे यांनी संपन्न असतो. या निधीच्या व्यक्तीची संपत्ती सात पिढ्या कायम राहते.

**३) नील निधी** : नवनिधीतील नीलनिधीधारक व्यक्तीजवळ दुर्मिळ संपत्ती असते. ही व्यक्ती सत्त्व आणि रजोगुणी मिश्रित असते. तिच्याजवळ ज्ञान आणि चातुर्य असते. तिची संपत्ती तीन पिढ्या टिकते.

**४) मुकुंद निधी** : कुबेराच्या खजिन्यातील हा निधी रजोगुणी असला तरी दैवी आशीर्वाद आणि अध्यात्माकडे ओढ असणारा असतो. कला, संगीताकडे ओढा असणारा आणि ऐश्वर्याने परिपूर्ण असतो. राज्यसंग्रही असणाऱ्या या निधियुक्ताची संपत्ती केवळ एक पिढी कायम राहते.

**५) नंद निधी** : समजा प्रसन्न होऊन हनुमंतांनी हा निधी दान दिला तर त्या भक्ताजवळ माती आणि शेती भरपूर असेल. सदैव आनंदी आणि समृद्ध असणारा हा माणूस राजस वृत्तीचा दीर्घायुषी, कुळाचा आधार आणि कुळाचा उद्धार करणारा असेल.

**६) मकर निधी** : नवनिधीतील मकर निधी प्राप्त माणूस तामस वृत्तीचा असतो. मात्र त्याच्याजवळ संपत्ती आणि शक्तीचे प्रचंड स्रोत असतात. या निधीत शस्त्र, अस्त्र आणि त्याद्वारे संपत्ती आलेली असते. शत्रूवर भारी पडणारी ही व्यक्ती असून तिचा मृत्यू मात्र वीरमृत्यू म्हणजे युद्ध करताना होतो.

**७) कच्छप निधी** : ज्या व्यक्तीला हा निधी प्राप्त असतो ती तामसिक असते. तिची संपत्ती स्थिर आणि दीर्घकाळ टिकणारी असते. ही व्यक्ती समृद्धीचे रक्षण करणारी पण संपत्ती लपवून ठेवणारी असते.

**८) शंख निधी** : हा निधीयुक्त माणूस यश आणि कीर्तियुक्त असतो. तो प्रसिद्धीच्या झोतात असतो. खूप पैसा असला तरी तो त्याचा उपभोग घेत नाही. त्याची संपत्ती फक्त एका पिढीलाच उपयोगी ठरते.

**९) खर्व निधी** : हा निधी प्राप्त असलेला माणूस व्यापारात वृद्धी करणारा असतो. त्याला अनपेक्षित धन प्राप्त होते. त्याला मिश्रित फळ प्राप्ती असते.

या नवनिधी कुबेराजवळ असल्या तरी त्याला त्या इतरांना वितरित करण्याचा अधिकार नाही. मात्र नवनिधी प्रदान करण्याचा अधिकार महारुद्र हनुमंतरायांना आहे. म्हणूनच आपल्या संस्कृतीत मारुतीरायाची आराधना महत्त्वाची आहे. ती आपण केली पाहिजे म्हणजे आपल्याला नवनिधी प्राप्त होतील. ■

९८२२२६२७३५

### पुराचे पाणी घरात शिरू नये म्हणून...

३१ जुलैच्या तरुण भारतात बातमी होती की, एक हजार घरांमध्ये पुराचे पाणी शिरले. मंगळवार २८ जुलैला दुपारी नागपुरात मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे ८ कॉलनीमधील काही घरांत पावसाचे पाणी शिरून बरेच आर्थिक नुकसान झाले. पाऊस केव्हा, कसा व किती कोसळेल याचा भरवसा नसतो. अशा अचानक आलेल्या पावसामुळे पूर येऊन बऱ्याच घरांमध्ये पुराचे पाणी शिरते. पुराचे पाणी घरात शिरू नये म्हणून खालील उपाययोजना कराव्यात असे वाटते.



घराची प्लींथ (जोत) रस्त्याच्या तलांकापेक्षा उंच ठेवण्यात यावी, घराभोवती रस्ता तलांकापेक्षा उंच असा योग्य रपटा बांधण्यात यावा जेणेकरून पुराचे पाणी घरात येणार नाही अशी व्यवस्था करण्यात यावी, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी नाल्यांतील कचरा नियमित काढून टाकावा, अतिक्रमण हटवून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटारे, नाल्या व नदी यांचे क्षेत्रफळ वाढवण्यात यावे, प्रशासनाने नैसर्गिक जलमार्ग मोकळा ठेवणे आवश्यक आहे, दरवाजांसमोर वाळूच्या पोत्यांचा मजबूत अडथळा बांधावा, पाणी उंच भागाकडून सखल भागाकडे वाहत असल्यामुळे जमिनीचे उतार स्थानिक प्रशासनाने तयार करावे. प्रश्न पुराच्या पाण्याचा असल्यामुळे याबाबतीत जलसंपदा विभाग व मनपा यांनी संयुक्तपणे कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

■■■

### आपल्याच ताटात विष?

आजकाल वृत्तपत्रे उघडली, टीव्ही लावला किंवा सोशल मीडिया बघितला की एकच बातमी सारखी समोर येते - 'अन्नातील भेसळ!' कधी दुधामध्ये युरिया किंवा डिटर्जंट, तर कधी मसाल्यांमध्ये खतांची आणि विटांच्या पावडरची भेसळ. फक्त घरचेच नाही, तर बाजारात मिळणारे पॅकेज्ड फूड आणि हॉटेल्समधील जेवणसुद्धा यापासून सुरक्षित राहिलेले नाही, हे बघून मन सुन्न होते. नुकत्याच समोर आलेल्या काही ताज्या घटनांनी तर अक्षरशः डोळे उघडून दिले आहेत. काही दिवसांपूर्वीच पाम ऑईलचा पुनर्वापर, रासायनिक रंग मिसळलेले खाद्यपदार्थ किंवा हॉटेलमधील शिळे अन्न खाल्ल्यामुळे लोकांना अन्नातून विषबाधा झाल्याच्या घटना घडल्या. काही ठिकाणी तर सेलिब्रेशनसाठी आणलेले केक किंवा फास्ट फूड खाल्ल्यानंतर लहान मुले आणि तरुण थेट रुग्णालयात दाखल झाल्याचे वृत्त आपण वाचतो. हे सर्व पाहिल्यानंतर प्रश्न पडतो की, आपण पैसे देऊन विकत आजारपण ओढवून घेत आहोत का?

लहान मुलांच्या आवडीचे पॅकेज्ड ज्यूस, चिप्स, चॉकलेट्स असोत किंवा बाहेर हॉटेलमध्ये आवडीने खाल्लेले बर्गर-पिझ्झा असोत, त्या प्रत्येक घासात रासायनिक विष आणि निकृष्ट दर्जाचे घटक लपलेले असतात. लहान मुले ही आपल्या देशाचे भविष्य आहेत, पण आज लहान वयातच त्यांना लठ्ठपणा, पोटाचे आजार, पचनक्रिया बिघडणे, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे आणि भविष्यात कर्करोगासारखे गंभीर आजार जडण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. आपण ग्राहकांनी आता डोळे उघडण्याची वेळ आली आहे. चकचकीत पॅकेजिंग आणि आकर्षक जाहिराती बघून आकर्षित होण्याऐवजी अन्नपदार्थांचा दर्जा तपासायला हवा.

प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासनाने अशा भेसळ करणाऱ्यांवर आणि हॉटेल्सवर कडक कारवाई केली पाहिजे. नुसते छापे टाकून दंड आकारण्यापेक्षा आता कठोर शिक्षेची गरजचे आहे. जितके शक्य होईल तितके ताजे, घरगुती आणि नैसर्गिक अन्न खाण्यावर भर दिला पाहिजे. आपल्या आरोग्याची आणि मुलांच्या भविष्याची काळजी घेण्याची सुरुवात आजपासूनच करायला हवी!

**वर्षा आवदे**/नागपूर

## वाचक पत्रे

■■■

### राष्ट्रकुल स्पर्धेतील पदके जेन-झीसाठी प्रेरणा

जेन-झी ही नव्या विचारांची, तंत्रज्ञानाशी मैत्री असलेली आणि बदल स्वीकारणारी पिढी आहे. ही पिढी नवकल्पना, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांना महत्त्व देते. इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञान मिळवून स्वतःचा सर्वांगीण विकास करण्याची त्यांची तयारी असते. सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता, पर्यावरण संरक्षण आणि मानसिक आरोग्याबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. नवीन कौशल्ये शिकण्याची आणि उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची त्यांच्यात मोठी क्षमता आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी मिळवलेली पदके ही संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या अथक परिश्रम, शिस्त, जिद्द आणि राष्ट्रासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या भावनेतून प्रत्येकाने सकारात्मक प्रेरणा घ्यावी. विशेषतः जेन-झीने त्यांच्या यशाकडे केवळ पदक म्हणून न पाहता, कठोर परिश्रम, सातत्य आणि ध्येयपूर्तीचे प्रतीक म्हणून पाहावे. जेन-झी आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान देऊ शकते. त्यादृष्टीने त्यांना प्रवाहाच्या योग्य दिशेत आणण्याची जबाबदारी प्रत्येक जागरूक भारतीय नागरिकाची आहे. ■

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पंढरपूर दिंडीत गेलेल्या महिलेच्या घराची घरफोडी

### धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील घटना...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

पंढरपूर दिंडीत सहभागी होण्यासाठी घर बंद करून गेलेल्या महिलेच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने संसारोपयोगी वस्तूंची चोरी केल्याची घटना ढोकी येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लता लिंबराज कंगले (वय ६०, रा. राजेशनगर, ढोकी, ता. जि. धाराशिव) या पंढरपूर दिंडीत सहभागी होण्यासाठी गेल्या असताना ७ जुलै रोजी रात्री ८ ते २ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील सुमारे ८ हजार रुपये किमतीच्या संसारोपयोगी वस्तू चोरून नेल्या.



याप्रकरणी लता कंगले यांनी ४ ऑगस्ट रोजी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ढोकी पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### चव्हाणवाडीत अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**इटकळ, दि.५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील चव्हाणवाडी येथे डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात २५ युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून अण्णाभाऊंना अनोखे अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या संघर्षमय जीवनकार्य व सामाजिक विचारांचा गौरव केला. सोलापूर येथील शिवशंभो ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात आले. सर्व रक्तदात्यांचा रेनकोट व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ व युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

### सिद्धेश्वर व्हटकर यांचे निधन

**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**



शहरातील साईनगर येथील रहिवासी सेवानिवृत्त औषधनिर्माण अधिकारी सिद्धेश्वर पिराजी व्हटकर (वय ८४) यांचे सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रात्री कपिलधार स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (महसूल) प्रकाश व्हटकर यांचे वडील होत.

### आप्पासाहेब चव्हाण यांचे निधन

**तुळजापूर, दि.५ ऑगस्ट -**



येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय परिसरातील रहिवासी तथा धाराशिव तालुक्यातील रूईभर येथील मूळ रहिवासी कै. आप्पासाहेब शामराव चव्हाण (वय ५५) यांचे मंगळवार (दि.४) रोजी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर तुळजापूर येथील घाटशिळ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## आमदार राणा पाटील यांच्या निर्णयाकडे नळदुर्गचे लक्ष!

# भाजपचा नवा स्वीकृत सदस्य कोण? घोडके की पोतदार, की दुसरेच नाव?

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ ऑगस्ट -**

नळदुर्ग नगरपालिकेतील भाजपचे स्वीकृत सदस्य प्रविण गायकवाड यांनी सदस्यपदाचा राजीनामा दिल्याने आता त्यांच्या जागी कोणाची वर्णी लागणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. भाजपकडून अनेक इच्छुकांनी फिल्डिंग लावली असली तरी अंतिम निर्णय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या भूमिकेवर अवलंबून असल्याची चर्चा आहे.




नळदुर्ग नगरपालिकेत भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांची सत्ता असून भाजपचे १०, शिवसेना (शिंदे गट)चा १ आणि काँग्रेसचे ९ नगरसेवक आहेत. नगरपालिकेत सत्ताधारी आघाडीचा एक आणि काँग्रेसचा एक असे दोन स्वीकृत सदस्य निवडण्यात आले होते.

भाजपकडे स्वीकृत सदस्यपदासाठी मोठ्या प्रमाणावर इच्छुक असल्याने जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी मिळावी या उद्देशाने आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी स्वीकृत सदस्याचा कार्यकाळ सहा महिन्यांचा ठेवला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात मातंग समाजातील युवक प्रविण गायकवाड यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

ठरल्याप्रमाणे सहा महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर प्रविण गायकवाड यांनी ४ ऑगस्ट रोजी आपल्या पदाचा राजीनामा देत इतर कार्यकर्त्यांनाही संधी मिळावी, अशी भूमिका घेतली. त्यामुळे आता नव्या स्वीकृत सदस्याच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

यावेळी भाजपचाच सदस्य निवडला जाणार की मित्रपक्ष शिवसेना (शिंदे गट)ला ही संधी दिली जाणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. शिवसेनेला संधी मिळाल्यास माजी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांचे नाव आघाडीवर मानले जात आहे.

दुसरीकडे भाजपकडूनही अनेक इच्छुक रिंगणात असून भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार यांचे नाव सध्या सर्वाधिक चर्चेत आहे. याशिवाय नगराध्यक्ष बसवराज धरणे आणि भाजपच्या दहा नगरसेवकांच्या मतालाही या निवडीत महत्त्व असणार असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, स्वीकृत सदस्यपदासाठी कोणाची निवड होणार, याचा अंतिम निर्णय आमदार राणा जगजितसिंह पाटील घेणार असल्याने नळदुर्गच्या राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. आता घोडके, पोतदार की आणखी एखाद्या नव्या चेहऱ्याला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जंगम मठाच्या जागेबाबतचा नगरपरिषदेचा ठराव रद्द करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

तुळजापूर येथील लिंगायत समाजाच्या जंगम मठाच्या जागेबाबत तुळजापूर नगरपरिषदेने १० जुलै २०२६ रोजी सर्वसाधारण सभेत मंजूर केलेला ठराव तात्काळ रद्द करण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जंगम मठ ट्रस्टच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तुळजापूर नगरपरिषदेच्या पाठीमागील सिटी सर्व्हे क्रमांक ९७२ ही जागा लिंगायत समाजाच्या जंगम मठाची असून हैदराबाद इंडोमेंट रेग्युलेशन ॲक्ट १३४९ फसलीनुसार ती धार्मिक संस्थेची नोंदणीकृत मालमत्ता आहे. शासनाने १९६२ मध्ये तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली या ठिकाणी ट्रस्टची स्थापना केली होती. ट्रस्टच्या २,३६४ चौरस मीटर क्षेत्रापैकी ७३१ चौरस मीटर जागेवर सुमारे ५७ वर्षांपूर्वी नगरपरिषदेने भाजी मंडईचे आरक्षण टाकले होते. त्यानंतर १९७८ मध्ये भूसंपादनाची प्रक्रिया कागदोपत्री करण्यात आली. मात्र, तत्कालीन तहसीलदार तथा ट्रस्ट अध्यक्षांनी या कारवाईला विरोध दर्शविल्यानंतर नगरविकास विभागाने १९७६, १९७८ आणि १९८३ मध्ये नगरपरिषदेच्या कारवाईला स्थगिती दिल्याचा दावा ट्रस्टने केला आहे.

भूसंपादनाची कोणतीही भरपाई आजपर्यंत ट्रस्टला देण्यात आलेली नसून संबंधित जागेचा ताबा आजही ट्रस्टकडेच असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी प्रफुल मस्के, महाबळेश्वर तोडकरी, राजेंद्र मुंडे, विश्वनाथ शेटे, गुरुनाथ बडूरे, गिरीश पाळणे, रवी कोरे, कैलास मस्के, भारत कोप्पा, विजय तोडकरी, आलोक नडमने, विशाल शेटे, अनिल बचाटे, पवन कोरे, समाधान भोरे, राजेश बिराजदार, महेश उपासे, श्रीकांत साखरे, अनुप मस्के, नितीन मस्के आदी उपस्थित होते.

## तेरखेड्यात पुन्हा राजकीय संघर्ष; दोन गटांमध्ये तुफान हाणामारी

**दगडफेक, वाहनांची तोडफोड; ४५ जणांवर गुन्हे दाखल...**



**१० जण पोलिसांच्या ताब्यात**



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे माजी आमदार राहुल मोटे आणि विद्यमान आमदार तानाजी सावंत यांच्या समर्थकांमध्ये पुन्हा एकदा तुफान हाणामारी झाल्याने गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही गट आमनेसामने आल्याने दगडफेक, मारहाण आणि वाहनांची तोडफोड झाली. या हिंसक संघर्षात दोन्ही गटांतील अनेक जण जखमी झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनाही दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

विशेष म्हणजे, अवघ्या तीन महिन्यांपूर्वीही याच दोन गटांमध्ये सार्वजनिक ठिकाणी मोठा संघर्ष झाला होता. त्या घटनेनंतर पुन्हा २ आणि ३ ऑगस्ट रोजी दोन्ही गट समोरासमोर आल्याने जुन्या वादाने पुन्हा हिंसक रूप धारण केले. सलग दोन दिवस सुरू राहिलेल्या या संघर्षामुळे तेरखेडा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेदरम्यान दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर दगडफेक करण्यात आली. तसेच अनेक दुचाकी व चारचाकी वाहनांची तोडफोड झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच येरमाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

घटनेनंतर तेरखेडा गावात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गावातील प्रमुख चौक, संवेदनशील ठिकाणे आणि मुख्य रस्त्यांवर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला असून गावाला छावणीचे स्वरूप आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून सातत्याने गस्त घालण्यात येत आहे.येरमाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत घोडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी दोन्ही गटांतील ४५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून १० जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेचा पुढील तपास येरमाळा पोलीस करीत आहेत.

तीन महिन्यांपूर्वी झालेल्या संघर्षानंतर पुन्हा त्याच गटांमध्ये हिंसक वाद उफाळून आल्याने तेरखेडा परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून दिल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडितेच्या वैद्यकीय जबाबावरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधित तरुणासह बालविवाहासाठी संगनमत करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता ही ९ जुलै २०२५ रोजी अल्पवयीन असताना संबंधित आरोपींनी संगनमत करून तिचा एका तरुणाशी बालविवाह लावून दिला. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या अत्याचारातून पीडिता गर्भवती राहिली असून तिने एका मुलीला जन्म दिला आहे.

पीडितेने ४ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या वैद्यकीय जबाबाच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## मद्यधुंद दुचाकी चालकावर गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

बार्शी नाका परिसरात मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवणाऱ्या एका चालकाविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश राजेंद्र सुतार (वय ४३, रा. जुनोनी, ता. जि. धाराशिव) हे दि. ४ ऑगस्ट रोजी एमएच-२५ बीबी-४१८८ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे आढळून आले. यापक्रणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## 'वक्ता धाराशिवचा, आवाज तरुणाईचा' स्पर्धेत जवाहर महाविद्यालयाचा दबदबा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.५ ऑगस्ट -**



**समर्थ लोंढे प्रथम, प्रतीक्षा गायकवाड तृतीय**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर येथे स्वर्गीय विलासराव देशमुख सेंटरच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय 'वक्ता धाराशिवचा, आवाज तरुणाईचा' या वक्तृत्व स्पर्धेत जवाहर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत समर्थ लक्ष्मण लोंढे याने प्रथम क्रमांक, तर प्रतीक्षा सिद्धार्थ गायकवाड हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. जवाहर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने परीक्षकांची मने जिंकत यश मिळविले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र दादा आलुरे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, प्रा. भालचंद्र बिराजदार, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे आणि डॉ. विश्वास माने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेतील यशासाठी विद्यार्थ्यांना डॉ. मल्लिनाथ बिराजदार, डॉ. विवेकानंद वाहुळे, डॉ. सुनील रजपूत, डॉ. उमाकांत सलगर आणि बसवंत बागडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रकाश भुरे, अंदुबा हलूंगडे, संतोष चौधरी, नामदेव काळे, दिलीप चव्हाण, अमित आलुरे आणि गणेश सरजे यांनी सहकार्य केले.

## सयाजीराव देशमुख यांची काँग्रेसच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी पुनर्नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील काँग्रेस कार्यकर्ते सयाजीराव विजयसिंह देशमुख यांची काँग्रेसच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी पुन्हा एकदा नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या पक्षनिष्ठा आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे.



देशमुख यांच्याकडे यापूर्वी २९ जुलै २०२४ रोजी जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ते काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते असून, संघटन बळकटीकरणासह सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करत आहेत. त्यांनी संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून काम केले असून, सध्या कुलस्वामिनी सहकारी सुतगिरणीचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

त्यांच्या पुनर्नियुक्तीबद्दल काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## वीजवाहिनीची १७ लाखांची ॲल्युमिनियम तार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

नळदुर्ग परिसरातील विविध ठिकाणांवरील वीजवाहिनीची तब्बल १७ लाख ५ हजार ४२४ रुपये किमतीची ॲल्युमिनियम तार चोरीला गेल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानंतर नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ मे २०२४ ते २६ मे २०२४ या कालावधीत गंधोरा-बसवंतवाडी टॉवर लाईन, गंधोरा-चिवरी टॉवर लाईन, सलगरा परिसर तसेच बसवंतवाडी शिवारातील टॉवर लाईनवरून सुमारे ८.५ किलोमीटर लांबीची ॲल्युमिनियम वीजवाहिनीची तार अज्ञात चोरट्यांनी चोरी करून नेली. चोरीस गेलेल्या तारेची किंमत १७,०५,४२४ रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी रावसाहेब भानुदास शेंडे (वय ४३) यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तुळजापूर यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी ४ ऑगस्ट रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यावरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'संध्याकाळी ७ ते ९ टीव्ही-मोबाईल बंद' उपक्रमाला जिल्हाभरातून प्रतिसाद

### ७१२ ग्रामपंचायतींमध्ये अभ्यासासाठी दोन तासांचे वातावरण; धाराशिवचा प्रयोग ठरतोय राज्यासाठी आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय रुजविणे, वाढता स्क्रीन टाईम कमी करणे आणि कुटुंबातील संवाद अधिक सशक्त करण्याच्या उद्देशाने धाराशिव जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या 'संध्याकाळी ७ ते ९ टीव्ही-मोबाईल बंद' या अभिनव उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील ७१२ ग्रामपंचायतींमध्ये दररोज सायंकाळी सात वाजता ग्राम पंचायतीचा भोंगा वाजताच अभ्यासासाठी दोन तासांचे वातावरण निर्माण होत असून अनेक गावांमध्ये हा उपक्रम आता लोकचळवळीचे स्वरूप धारण करू लागला आहे.



जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ राज्याचे ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला होता. 'आपला जीव धाराशिव - व्हिजन २०३०' या व्यापक संकल्पनेअंतर्गत राबविण्यात येणारा हा उपक्रम जिल्हा परिषदांच्या कामकाजात एक नवा आदर्श निर्माण करणारा ठरत आहे.

उपक्रमानुसार दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत टीव्ही आणि मोबाईलचा वापर टाळून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी केले आहे. या दोन तासांच्या कालावधीत शासकीय कर्मचारी गावोगावी जनजागृती करत उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करत आहेत.

या उपक्रमाला पालकांकडूनही मोठा प्रतिसाद मिळत आहे. अनेक कुटुंबांनी मुलांसोबत स्वतःही मोबाईल बाजूला ठेवत अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. काही गावांमध्ये 'मोबाईलमुक्त दोन तास' या संकल्पनेला प्रतिसाद देत नागरिक प्रेरणादायी संदेश, अनुभव आणि सेल्फी सोशल मीडियावर शेअर करत आहेत. त्यामुळे हा उपक्रम केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता सामाजिक सहभाग आणि कौटुंबिक नातेसंबंध अधिक दृढ करणारी चळवळ ठरत आहे.

वाढत्या डिजिटल व्यसनाच्या पार्श्वभूमिवर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी जिल्हा परिषदेने उचललेले हे पाऊल राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे. डिजिटल साधनांचा संयमी वापर, शिक्षणाला प्राधान्य आणि कुटुंबातील संवादाला बळ देणारा धाराशिवचा हा प्रयोग इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायी मॉडेल ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



मुलांच्या भवितव्यासाठी दररोज दोन तास स्क्रीनपासून दूर राहण्याचा हा साधा पण प्रभावी संकल्प शिक्षणासोबतच संस्कार, संवाद आणि सामाजिक बांधिलकीची नवी दिशा दाखवत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### शिवसेना उबाठा पदाधिकारी निवडी संदर्भात संपर्क प्रमुखांचा पाथरी,जिंतूर विधानसभा मतदार संघात दौरा

**पाथरी,/प्रतिनिधी :**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या परभणी जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीसाठी जिल्हा संपर्कप्रमुख प्रदिपकुमार खोपडे यांचा २ दिवसांचा दौरा आयोजित करण्यात आला आहे. हा दौरा पाथरी आणि जिंतुर विधानसभा मतदारसंघातील रिक्त पदाधिकारी पदांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी प्रसिद्धीपत्रका व्दारे दिली आहे. शिवसेना परभणी जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी ३१ जुलै रोजी दिलेल्या पत्रकानुसार, हा दौरा १ आणि २ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.शनिवार १ ऑगष्ट रोजी जिंतुर सकाळी ११ वा. संपर्क कार्यालय, जिंतुर परभणी ग्रामीण दुपारी २ वा. मा. आ. मिराताई रेंगे यांचे निवासस्थान, परभणी रविवार २ ऑगष्ट रोजी सोनपेठ सकाळी ११ वा. शिवसेना संपर्क कार्यालय, सोनपेठ. दुपारी २ वाजता पाथरी/मानवत शासकीय विश्रामगृह, पाथरी. या दौऱ्यात जिल्हा संपर्कप्रमुख प्रदिपकुमार खोपडे यांच्यासोबत आ. डॉ. राहुल पाटील, माजी आ. सौ. मिराताई रेंगे, पाथरी विधानसभा प्रमुख कल्याणराव रेंगे, जिंतुर विधानसभा प्रमुख रामनाना खराबे, सहसंपर्कप्रमुख पाथरी प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे आणि सहसंपर्कप्रमुख जिंतुर गंगाप्रसाद घुगे उपस्थित राहणार आहेत. जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी सर्व उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, तालुका संघटक, उपतालुका प्रमुख, उपशहर प्रमुख, सर्कल प्रमुख, उपसर्कल प्रमुख, माजी-आजी जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, शाखा प्रमुख आणि बुथ प्रमुखांना या बैठकींना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पाथरी आणि जिंतुर मतदारसंघातील पक्ष संघटना अधिक मजबूत करणे आणि रिक्त असलेली पदे भरणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

### पालम येथे ०६ ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व माधवराव पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पालम आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (दिंडोरी प्रणित), नाशिक, शाखा पालम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०६ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या कालावधीत पालम येथील माधवराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी (), क्षेत्र अधिकारी (), ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र, कार्यालयीन कर्मचारी (ऑफिस स्टाफ) आदी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी प्रारंभीचे मासिक वेतन रु. १० हजार ते रु. २५ हजार इतके असून अनुभवाच्या आधारे वेतनात वाढ होऊ शकते.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी असे आवाहन करण्यात आलेआहे.

# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत २० कोटींच्या २८ विकासकामांना मंजुरी

## पाणीपुरवठा, आरोग्य, घरकुल व विकासकामांवर सविस्तर चर्चा

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी:-** महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवारी (दि.२९) महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांच्या अध्यक्षतेखाली बी. रघुनाथ सभागृहात पार पडली. सभेत २० कोटींच्या २८ विकासकामांना मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये शहरातील पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, घरकुल योजना, रस्ते, उद्याने, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न, एलईडी प्रकाशयोजना तसेच विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

या सभेस उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, नगरसचिव विकास रत्नपारखी, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे, गटनेते तसेच नगरसेवक आणि अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी दिल्लीतील जंतर-मंतर येथे घडलेल्या घटनेतील मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर नगरसेविका गिरिजा आजेगावकर यांनी शहरातील विहिरींची स्वच्छता केल्याबद्दल महापौर, उपमहापौर, आयुक्त, उपायुक्त तुकाराम कदम, स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुर्रा आणि प्रल्हाद देशमाने यांचे अभिनंदन करणारा ठराव मांडला.

यावेळी शहरात सलग नऊ दिवस पाणीपुरवठा विस्कळीत राहिल्याचा मुद्दा गटनेत्या तिरुमला खिल्लारे, गिरिजा आजेगावकर, सपना जुकटे आणि रितेश जैन यांनी उपस्थित केला. पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख तन्वीर बेग यांनी तांत्रिक अडचणीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. धार रोड आणि आनंदनगर येथील जलवाहिनीतील गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले.

जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांतील नावांच्या त्रुटींमुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणींचाही मुद्दा सभेत गाजला. यावर आयुक्त नितीन नार्वेकर यांनी प्रभाग समिती 'अ', 'ब' आणि 'क' अंतर्गत स्वतंत्र जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालये सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. महापौर सय्यद इकबाल यांनी या कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची घोषणाही केली.

नगरसेविका अश्विनी अमोल जाधव यांनी कार्डियाक ॲम्ब्युलन्स दुरुस्त करून नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करण्याची मागणी केली. नगरसेवक अक्षय देशमुख यांनी कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि शववाहिका नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याची सूचना केली. यावर महापौरांनी वाहन ज्या अंतरासाठी जाईल त्या प्रमाणात इंधनाचा खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावा, असे सांगितले.

खंडोबा बाजार प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील रस्त्याची दुरुस्ती, शहरातील खड्डे बुजविणे, राजगोपालाचारी व नेहरू उद्याने खासगी तत्त्वावर न देणे, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, शहरातील सर्व विद्युत खांबांवर एलईडी दिवे बसविणे तसेच सण-उत्सवाच्या काळात प्रकाशव्यवस्था सक्षम करण्याबाबत विविध सदस्यांनी मागण्या केल्या. स्टेडियम परिसरातील प्रस्तावित राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी गटनेते दिलीप ठाकूर यांनी केली. संबंधित विभागाला तातडीने कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

सभेत मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. तसेच रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. 'महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद २०२६-२७' या योजनेअंतर्गत २० कोटी रुपयांच्या २८ विकासकामांना मंजुरी देण्याचा ठराव स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे यांनी मांडला. यावेळी अर्जुन सामाले यांनी प्रभाग क्रमांक १० मध्येही विकासकामांचा समावेश करण्याची मागणी केली.

सभेत सभागृहनेते सय्यद समी उर्फ माजू लाला, गटनेते विजय जामकर, डॉ. केदार खटींग, श्याम खोबे, शरफोद्दीन सिद्दिकी, शेख रईस, तब्बसुम वसीम शेख, गणेश टाक, व्यंकट डहाळे, सुशीला थोरात, अद्वैत सांगळे, सुलोचना भालेराव यांच्यासह अनेक नगरसेवकांनी विविध विषयांवर चर्चा करून नागरिकांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबविणार...

सभेत 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त आणि सर्व गटनेत्यांची समिती गठित करण्यास मंजुरी देण्यात आली.

## चांदजवळ एसटी बस पलटली

**जिंतूर, /प्रतिनिधी-** जिंतूर-परभणी मार्गावरील चांदज गावाजवळ गुरुवारी सकाळी एसटी बसचा अपघात होऊन २६ प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली. यापैकी दोन ते तीन प्रवाशांची प्रकृती गंभीर असून त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरहून जिंतूर येथे आलेली एसटी बस ३० जुलै गुरुवारी,सकाळी सुमारे ९ वाजता जिंतूरहून परभणीकडे ४१ प्रवाशांना घेऊन निघाली होती. चांदज गावाच्या अलीकडे समोर अचानक वाहन आल्याने बसचालकाने जोरात ब्रेक लावला. त्यामुळे बसवरील नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात जाऊन पलटी झाली.

या अपघातात २६ प्रवासी जखमी झाले. जखमींना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोन ते तीन जणांची प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. तसेच जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. इंगळे, डॉ. खाडे, डॉ. भुत्ते, डॉ. बामणे, डॉ. परिहार आदींनी जखमींवर तातडीने उपचार केले.ाची माहिती मिळताच घटनास्थळी तसेच ग्रामीण रुग्णालयात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू असून अधिक तपास संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.



## संस्थांचे बदल अर्ज निकालांच्या प्रतिक्षेत परभणी धर्मादाय कार्यालयातील प्रकार; नोटीस काढूनही निपटारा नाही

**सोनपेठ, /प्रतिनिधी-** प्रत्येक पाच वर्षांनी सार्वजनिक संस्थांना निवडणूक प्रक्रिया पूर्ण करुन सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून त्यास अंतिम मान्यता घेणे आवश्यक असते.यासाठी अनेक संस्था व वाचनालयांनी गेली दहा वर्षांपासून दाखल केलेले बदल अर्जाचे प्रस्ताव निकालाविना परभणी येथील सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयात धुळखात पडून आहेत.

या प्रकरणी चेंज रिपोर्ट साठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून अनेक वर्षे खेटे मारुनही निकाल मिळत नसल्याने विश्वतांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. धर्मादाय नोंदणी झालेल्या समाजसेवी संस्था, सार्वजनिक ग्रंथालये, सेवाभावी संस्था, मंदिर ट्रस्ट, व्यायाम शाळा, क्रीडा मंडळ, अनाथाश्रम , वृद्धाश्रम यांसारख्या विविध प्रकारच्या संस्थांची नोंदणी ही धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे होत असते.नोंदणी केलेल्या प्रत्येक संस्थांची निवडणूक ही दर पाच वर्षांनी घेणे अनिवार्य असते.निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थांनी झालेला बदल संदर्भात विहित नमुन्यातील बदल अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करावा लागतो.तदनंतर त्या अर्जावरील बदल केलेल्या जुन्या सदस्यांना नोटीस काढून बोलावले जाते. वारंवार नोटीस मिळून ही सदस्य धर्मादाय आयुक्त यांच्या समोर हजर राहून आपले म्हणणे मांडत नसतील तर संबंधित धर्मादाय आयुक्त त्या बदल केलेल्या नवीन सदस्यांचे आर्जावर सुनावणी घेऊन त्यास अंतिम मंजुरी देत असतात. परंतु गेल्या अनेक वर्षापासून परभणी येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयांमध्ये अनेक संस्थांनी दाखल केलेले बदल अर्ज निकाला विना धुळखात पडून आहेत. विहित नमुन्यात अर्ज दाखल करूनही सदरील अर्ज निकालाच्या प्रतीक्षेत कार्यालयात पडून आहेत.आहेत. प्रत्येक संस्था चालकांनी विहित नमुन्यात जुन्या विश्वस्तांना नोटीस काढण्यासाठी पोस्टातील तिकीट व लिफाफा धर्मादाय आयुक्त कार्यालयात आणून दिले आहेत. त्यानंतर कार्यालयाकडून संबंधितांना नोटीसही बजावण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रत्येक तारखेला सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचा सदस्य हजर करण्याचा रेटा पाहून संस्थाचालक आता वैतागले आहेत. वारंवार नोटीसा काढूनही जुने सदस्य कार्यालयात येत नाहीत, परिणामी त्यांचे म्हणणे मांडत नाहीत. तर अखेर चूक तरी कोणाची? बदल अर्ज दाखल करणाराची की, बदल अर्जांना मंजुरी न देणाराची? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. प्रत्येक महिन्याला बदल अर्ज दाखल करणारे संस्था प्रमुख हे परभणी येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात मागील अनेक वर्षापासून खेटे मारताना दिसत आहेत.

परंतु त्यांच्या अर्जांना मंजुरी मिळत नसल्याने अनेकांनी वैतागून आता खेटे मारणेही बंद केले आहे. त्यामुळे मागील अनेक दिवसापासून मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या बदल अर्जांना सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी तात्काळ मंजुरी देण्याची मागणी आता संस्थाचलकांतून जोर धरू लागली आहे.

### हिवरखेडा शाळेचे यश

**परभणी,/प्रतिनिधी**
येलदरी पासून जवळच असलेल्या,हिवरखेडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या स्कॉलरशिप परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शाळेचा ६५ टक्के निकाल लागला असून ८ पैकी ५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शाळेतील अर्पिता संतोष वलेकर हीने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. गुणवत्ता यादीत सिद्धिका संतोष माने ,शौर्य संतोष चिभडे, श्रीगणेश संतोष हुलगुंडे व अभिषेक मारोती कऱ्हाळे या विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मार्गदर्शक शिक्षक तथा मुख्याध्यापक श्री संतोष चिभडे, सह.शिक्षक श्री गौतम हजारे यांचे व विद्यार्थ्यांचे उपस्थिती होती.

## करारातील अटींचा भंग; नागरळ प्रा. इंडिया कंपनीवर कारवाईची मागणी

### जिंतूर नगरपरिषद सदस्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जिंतूर, /प्रतिनिधी-** जिंतूर नगरपरिषदेने शहरातील घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेचे काम नागरळ प्रा. इंडिया या कंपनीला कंत्राटाद्वारे दिले असले तरी संबंधित कंपनीकडून करारातील अटींचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप नगरसेवक बाळासाहेब भांबळे यांनी केला आहे. या प्रकरणी कंपनीवर तात्काळ कठोर कारवाई करून कंत्राट रद्द करावे, तसेच कंपनीला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात यावे,अशी मागणी त्यांनी दिनांक २८ जुलै रोजी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. रस्ते, नाल्या व सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे प्रमाण वाढल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व वाहनांची उपलब्धता नसल्याने शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून नागरिकांना दुर्गंधी व साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे.

संबंधित कंपनीने करारातील अटींचे पालन न करता निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत नगरसेवक बाळासाहेब भांबळे यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळल्यास कंपनीवर आर्थिक दंडात्मक कारवाई करावी, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कारवाई करावी, तसेच कंत्राट तात्काळ रद्द करून पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्वच्छता व्यवस्थेवर नियमित देखरेख ठेवावी, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी नगरसेवक अशोक बंड, जाबेर मुल्ला,करीम लाला,पिंटू डोंबे हे उपस्थित होते या निवेदनामुळे जिंतूर शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासन आता संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणती भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांच्या आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर दिंडोरी प्रणित नाशिक शाखा जिंतूर संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील १६ नामांकित आस्थापनांनी सहभाग नोंदविला. मेळाव्यास १७० सुशिक्षित बेरोजगार उमेदवार उपस्थित होते.

त्यापैकी १३६ उमेदवारांची प्राथमिक निवड, तर ९० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यामुळे अनेक युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. खंडेराव भिसे, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मिटकुळे सर, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाधान किरवले, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले. रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये योगेश येडपलवार (कनिष्ठ कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी), राहुल गजभारे, सचिन चव्हाण, राहुल काळे, प्रियंका कणके, शीला भालेराव, आणि विवेक भारती, अमित घुगे, किरण गजमल यांचा सक्रिय सहभाग होता. रोजगार मेळाव्यामुळे परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.



### आजाराला कंटाळून उंदीर मारण्याचे औषध प्राशन केल्याने ऑटोचालकाचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** सोरायसिसच्या आजाराला कंटाळून ऑटो चालक दत्ता नामदेव मगर (वय ४६, रा. राजेंद्रगिरी नगर) यांनी उंदीर मारण्याचे विषारी रसायन प्राशन केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नवा मोंढा पोलिस ठाण्यात २७ जुलै रोजी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयताचे भाऊ बंडू मगर यांनी याबाबत नवा मोंढा पोलिस ठाण्यात याबाबत खबर दिली आहे. दत्ता मगर यांनी सोरायसिसच्या आजाराला कंटाळून उंदीर मारण्याचे विषारी रसायन अंडाभुर्जीमध्ये टाकून प्राशन केले. त्यांना उपचारासाठी परभणी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान २७ जुलै रोजी दुपारी अडीचच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. प्रकरणाचा तपास पोहेकॉ. सचिन बोरसुडुकर करीत आहेत.

# पावसाळ्यात साथरोग उद्‌भवणार नाहीत यासाठी उपायोजना करा– गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दूषित पाण्यामुळे साथरोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पुरेशा प्रमाणात टीसीएल पावडर उपलब्ध ठेवावी तसेच पाण्याचे नमुने नियमितपणे तपासणीसाठी पाठवावेत, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिले.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात कार्यकारी समितीची बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी आरोग्य विभागाच्या विविध योजना व कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. डूडुळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरवाडे, बालरोग तज्ज्ञ डॉ. गोपाल कदम, डॉ. सुनील देशमुख, डॉ अभिजित बांगर, जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. डी. व्ही. सावंत, डॉ. संदीप काळे, डॉ. नारायण शिंदे, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, डॉ. प्रशांत पुठावार, समूल्यांकन अधिकारी अमोल कुलकर्णी, डीपीएचएन मनिषा वडकुते, शीतल मानतकर, संदीप मुरकर, मुनाफ शेख, विजय भालेराव, विजय पाठक यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दूषित आढळलेल्या पाणीस्त्रोतांचे तातडीने शुद्धीकरण करून त्यानंतर फेरतपासणीसाठी पाण्याचे नमुने पाठविण्यात यावेत. पावसाळ्यात नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेऊन साथरोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य यंत्रणेने सतर्क राहावे, अशा सूचना गायकवाड यांनी दिल्या.

या बैठकीत टी बी मुक्त भारत अभियान, राष्ट्रीय कुष्ठरोग कार्यक्रम, प्रेरणा प्रकल्पांतर्गत मनशक्ती क्लिनिक, राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, पॅलिएटिव्ह केअर, गरोदर मातांची नोंदणी व तपासणी, बाल आरोग्य, रुग्ण कल्याण समिती, सिकलसेल आजार नियंत्रण, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम, संस्थात्मक प्रसूती, आयुष, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके, कुटुंब कल्याण शिबिर तसेच एनक्यूएएस आदी कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला.

पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामकाजाचा आढावा घेताना अवैध लिंगनिदानास प्रतिबंध करण्यासाठी स्ट्रिंग ऑपरेशन करण्याचे निर्देश गायकवाड यांनी दिले. तसेच मुलीच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी आवश्यक जनजागृती करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. माता व बाल संगोपन कार्यक्रमाचा आढावा घेताना प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करून कुटुंब कल्याण स्त्रीशस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढविण्यावर भर देताना गरज नसताना प्रसूतीसाठी रुग्णांना इतरत्र संदर्भित करू नये, अशा स्पष्ट सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. नागरिकांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्यातील १२ प्राथमिक आरोग्य केंद्रांनी मानांकन प्राप्त करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सांगितले.

राष्ट्रीय असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह व कर्करोगाच्या तपासणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ांतर्गत आरबीएसके पथकांमार्फत शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्यातील सर्व रुग्णवाहिका सुस्थितीत असून त्या तातडीच्या सेवेसाठी उपलब्ध राहतील, याची संबंधितांनी खात्री करावी. या बैठकीस तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# शिष्यवृत्तीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

हिंगोली जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षात भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी संकेतस्थळावर अर्ज करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये व वरिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक आणि प्राचार्य यांची कार्यशाळा (दि. ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, हिंगोली येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त गीता गुठ्ठे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक डॉ. अभिजीत पाटील, पोलीस निरीक्षक सुनिता शिंदे, सहायक संचालक तथा सहायक सरकारी अभियोक्त्या देवयानी सरदेशपांडे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक प्रदीप धर्माधिकारी आणि बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सहाय्यक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीची शंभर टक्के प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्थास्तरापासून जिल्हास्तरापर्यंत नियोजनबद्ध कार्यवाही करण्याची आवश्यकता व्यक्त केली. यासाठी पात्र लाभार्थ्यांचे मॅपिंग व नोंदणी, आधार व बँक खाते संलग्नता, संस्थास्तरीय उत्तरदायित्व, जनजागृती व मदत केंद्रे, त्रुटी निवारण तसेच नियमित देखरेख व आढावा या बाबींवर विशेष भर देण्यात आला.

सर्व शासकीय, अनुदानित व खासगी शाळा–महाविद्यालयांमधील युडायस+ नुसार प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा आधार आधारित डेटाबेस तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मागील वर्षी शिष्यवृत्ती न मिळालेल्या अथवा अर्ज करता न आलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचा यावर्षी शंभर टक्के समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, बँक खाते व एनपीसीआय मँपींग किंवा आधार संलग्न करण्यासाठी भारतीय पोस्ट बँक तसेच स्थानिक बँकांच्या सहकार्याने विशेष शिबिरे आयोजित करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला तसेच बँक खात्याशी संबंधित त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शाळांचे मुख्याध्यापक, गट शिक्षण अधिकारी आणि महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर अनिवार्य कार्यशाळा आयोजित करण्यावर भर देण्यात आला. संस्थास्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या शाळा व महाविद्यालयांबाबत शिस्तभंगाची कारवाई तसेच एसएलए निश्चित करण्याबाबत माहिती देण्यात आली. शिष्यवृत्ती अर्जाच्या प्रगतीचा जिल्हास्तरावर दर सोमवारी आढावा घेण्यात येणार आहे. सर्व मुख्याध्यापक व प्राचार्यांनी शिष्यवृत्ती अर्जांची अद्ययावत माहिती दर सोमवारी सकाळी १०.३० वाजेपर्यंत समाज कल्याण कार्यालयास सादर करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी केले.

# टीबीमुक्त भारताचे उद्दीष्टपूर्तीसाठी पुढाकार घ्या– विवेक गायकवाड




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

केंद्र शासनाच्या 'टीबी मुक्त भारत' अभियानांतर्गत हिंगोली जिल्ह्याने आरोग्य क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. जिल्ह्यातील ५६३ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ३०४ ग्रामपंचायती यापूर्वीच 'टीबी मुक्त' म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर चालू वर्षातही जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायती टीबी मुक्त करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये यांच्या नियोजनाखाली 'टीबी मुक्त हिंगोली' ही चळवळ अधिक तीव्र करण्यात येत आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सोबतच गावातील ग्रामपंचायत सदस्य, आशा वर्कर, अंगणवाडी ताई आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून टीबी मुक्त भारत अभियानाला हातभार लावावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले आहे.

१५ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त ग्राम पंचायती पात्र करण्याचे निर्देश

मोहिमेच्या आढाव्यासाठी मंगळवारी जिल्हा परिषद हिंगोली येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना येत्या १५ ऑगस्टपर्यंत अधिकाधिक ग्रामपंचायती टीबी मुक्त निकषांनुसार पात्र ठरतील, यावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. तसेच 'निक्षय मित्र' संकल्पनेअंतर्गत समाजातील दानशूर व्यक्ती व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन गावातील टीबी रुग्णांना दत्तक घ्यावे आणि त्यांना आवश्यक पोषण आहार उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही गायकवाड यांनी या वेळी केले



**हिंगोली– परभणी–हिंगोली जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या उपाध्यक्षपदी राजेश पाटील गोरेगावकर यांची निवड झाल्याबद्दल तसेच संचालक राजवर्धन राजेश पाटील यांचा सत्कार करतांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव सुजय देशमुख, अॅड स्वप्नील इंगळे, ऋषीकेश शहाणे आदी. छाया– विजय गुंडेकर**

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३ लाख ८७ हजारांच्या प्रतिबंधित गुटख्यासह कार केली जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बासंबा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहीतीवरून एका कारची तपासणी केली असता त्यामध्ये ३ लाख ८७ हजार २०० रूपयांचा शासनाने प्रतिबंधित गुटखा तसेच स्वीफ्ट डिझायर कार असा एकूण ७ लाख ८७ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्याविरूध्द पोलिसांनी जोरदार मोहीम उघडली आहे. अवैध वाळू वाहतुक, वाळू उपसा तसेच इतर अवैध धंद्यावर पोलिस थेट कारवाई करीत आहेत. त्यामुळे अवैध धंदेचालकांचे धाबे दणाणले आहेत.

हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली बासंबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहीतीच्या आधारे पोलिसांनी एका कारची तपासणी केली. ही कार सिरसम ते बासंबा मार्गे हिंगोलीकडे येत होती. या रस्त्यावर नाके नसल्यामुळे या मार्गावरून अशा प्रकारे अवैध गुटखा आणल्या जात असल्याचीही माहीती पोलिसांना मिळाली. तपासणीमध्ये कार क्रमांक एमएच १२ के एन ६०३९ मध्ये पोलिसांना महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा पान मसाला तंबाखू विक्री करण्यासाठी जूमडा पाटी येथे ३ लाख ८७ हजार २०० रूपये किंमतीचा गुटखा व कार अंदाजे किंमत ४ लाख रूपये असा एकूण ७ लाख ८७ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी आरोपी नासीर शेख सुलेमान वय ३० रा मस्तानशहा नगर याच्याविरोधात बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वसंत आरसेवार, अंमलदार पांडूरंग राठोड, लिंबाजी वाव्हळे, गजानन पोकळे, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे यांनी केली आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आरोग्य सुविधांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**



जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली येथे भेट देऊन रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी अत्याधुनिक शस्त्रक्रिया कक्ष, क्रिटिकल केअर ब्लॉक तसेच कॅथ लॅबच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली.

या पाहणीदरम्यान काही कामे व आवश्यक दुरुस्तीची बाब निर्दर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेश जोशी यांना संबंधित कामांमध्ये आढळलेल्या त्रुटींची तातडीने दुरुस्ती करून घेण्याचे निर्देश दिले. रुग्णालयातील वैद्यकीय सुविधा सुरळीतपणे आणि सुरक्षितपणे कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक ती कामे विलंब न करता पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

कॅथ लॅब तसेच क्रिटिकल केअर ब्लॉकच्या कार्यान्वयनासाठी अखंडित व पुरेसा विद्युत पुरवठा अत्यंत आवश्यक असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांना कॅथ लॅब व क्रिटिकल केअर ब्लॉक येथे तातडीने ट्रान्सफॉर्मर बसविण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या सुविधांमुळे जिल्ह्यातील रुग्णांना हृदयविकार तसेच गंभीर स्वरूपाच्या आजारांवर आवश्यक उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार व अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# १०० हेक्टर क्षेत्रावर लॉजिस्टीक पार्क उभारणीची शक्यता तपासण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

जिल्ह्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी प्रस्तावित एमआयडीसी क्षेत्रांच्या विकासाबाबत आवश्यक तो पाठपुरावा करून प्रक्रिया गतिमान करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील प्रस्तावित अतिरिक्त हिंगोली एमआयडीसी अंतर्गत मौजे वारंगा फाटा, दाभाडी व कुर्तडी येथील सामायिक क्षेत्रातील ४३२.२६ हेक्टर जमीन प्रस्तावित आहे. तसेच मौजे कामठा, येलकी, जरोडा व डोंगरगाव पूल येथील सामायिक क्षेत्रातील २०५–७९ हेक्टर जमीन एमआयडीसीसाठी प्रस्तावित आहे. या दोन्ही प्रस्तावित क्षेत्रांच्या विकासासाठी आवश्यक ती कार्यवाही व पाठपुरावा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

यासोबतच जिल्ह्यातील औद्योगिक विकासाच्या दृष्टीने सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावर लॉजिस्टिक पार्क उभारता येईल का, याची शक्यता तपासून त्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी नांदेड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय अधिकाऱ्यांना दिल्या. प्रस्तावित दोन्ही एमआयडीसी क्षेत्रांबाबत संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून नियमित पाठपुरावा करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, व्यवस्थापक रविंद्र पत्की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाच्या भूमापक श्रीमती एस. व्ही. फड तसेच संबंधित गावांचे तलाठी उपस्थित होते.

या दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कळमनुरी तालुक्यातील येलकी येथील १६ वी बटालियन सशस्त्र सीमा दलाला भेट देऊन पाहणी केली.

त्यानंतर त्यांनी कळमनुरी येथील नमो गार्डनला भेट देऊन वृक्षारोपण केले. तसेच ढोलक्याची वाडी येथील व्यायामशाळेला भेट देऊन पाहणी केली. कळमनुरी ते ढोलक्याची वाडी या रस्त्याचीही त्यांनी पाहणी करून रस्त्याच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

जिल्ह्यात औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करण्यासोबतच विविध विकासकामांना गती देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी दिले.

# अखेर वसमत उपनराध्यक्षांचा राजीनामा, गोवंश प्रकरण भोवले, नवीन उपनगराध्यक्ष निवडीच्या हालचाली



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ५ ऑगस्ट**

तालुक्यातील जवळा खंदारबन शिवाराज १९ गोवंश सापडल्यानंतर वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर त्यांनी नुकताच पदाचा राजीनामा दिला असून त्यांचा राजीनामा बुधवार दि ५ ऑगस्ट रोजी मंजूर करून जिल्हा प्रशासनाकडे याबाबत कळविण्यात आले आहे. राजीनाम्यात प्रकृती व वैयक्तिक कारणामुळे राजीनामा देत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

वसमत तालुक्यातील जवळा खंदारबन शिवारात एका शेतात वसमत ग्रामीण पोलिसांच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात १९ गोवंश आढळून आले होते. चारा, पाण्याशिवाय बांधलेले गोवंश कत्तलीसाठी वाहतुक करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचा संशय होता. त्यानुसार दि ३० जुलै रोजी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात उपनगराध्यक्ष इमरान अली यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. सहाय्यक पोलिस निरीक्षक रामदास निरदोडे, जमादार विजयकुमार उपरे यांनी अधिक तपास चालविला आहे. यावेळी पोलिसांच्या चौकशीमध्ये इमरान अली याने सदर शेत शेख जाकेर याला खंडून दिल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी शेख जाकेर याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणानंतर दोषींवर कडक कारवाई करावी, उपनगराध्यक्ष इमरान अली यांचा राजीनामा घ्यावा या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दलासह हिंदुत्ववादी संघटनांनी वसमत बंदचे आवाहन देत मोर्चा काढला होता. राजीनामा घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाला निवेदनाही सादर करण्यात आले होते. त्यामुळे वसमत शहराचे वातावरण चांगलेच तापले होते.

या प्रकरणानंतर उपनगराध्यक्ष इमरान अली यांनी पदाचा राजीनामा नगराध्यक्षा सुनीता बाहेती यांच्याकडे दिला आहे. त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला असून पुढील प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे. राजीनाम्यात प्रकृती व वैयक्तिक कारणामुळे आपण वेळ देऊ शकत नसल्याने राजीनामा देत असल्याचे पत्रात नमुद करण्यात आले आहे. आता नवीन उपनगराध्यक्ष निवडीसाठी वसमत नगर पालिकेत राजकीय हालचालींना वेग आला असून आमदार राजेश पाटील नवघरे यांच्या भुमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# नरसी ग्रामपंचायत कार्यालय शौचालयाविना; नागरिक, महिला व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ ऑगस्ट -**

केंद्र व राज्य शासनाच्या वतीने ग्रामीण भागात स्वच्छतेसाठी आणि शौचालय उभारणीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असल्याचे चित्र असताना, नायगाव तालुक्यातील सर्वात मोठ्या आणि १७ सदस्यांची ग्रामपंचायत असलेल्या नरसी ग्रामपंचायत कार्यालयातच शौचालयाची सुविधा नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, रोज विविध कामांसाठी येणाऱ्या शेकडो नागरिकांना, विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून, या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नरसी ग्रामपंचायत ही तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक मानली जाते. जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे, करभरणा, शासकीय योजनांची माहिती, अर्ज आदी कामांसाठी दररोज सुमारे ४०० ते ५०० नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात येत असतात. मात्र, कार्यालयात मूलभूत सुविधा म्हणून शौचालयच उपलब्ध नसल्याने नागरिकांना अक्षरशः मनस्ताप सहन करावा लागत आहे.

यात भर म्हणजे ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती नरसी आणि कुंटूर या दोन ग्रामपंचायतींसाठी असल्याने ते आठवड्यातील दोन दिवस नरसी तर दोन




दिवस कुंटूर येथे उपस्थित राहतात. त्यामुळे संबंधित अधिकारी कार्यालयात येईपर्यंत अनेक नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. या प्रतीक्षेदरम्यान शौचालयाची कोणतीही व्यवस्था नसल्याने महिला, विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींची विशेष गैरसोय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ग्रामीण स्वच्छतेचे धडे देणाऱ्या आणि गावोगावी शौचालय उभारणीचे अभियान राबविणाऱ्या प्रशासनाच्या नजरेसमोरच ग्रामपंचायत कार्यालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी ही अत्यावश्यक सुविधा नसणे, हा विरोधाभास असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनाही यामुळे तडा जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या मते, ग्रामपंचायत कार्यालय हे गावाच्या प्रशासनाचे केंद्रबिंदू मानले जाते. अशा ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि बसण्याची व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा असणे अपेक्षित आहे. मात्र, शौचालयाच्या अभावामुळे विशेषतः महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा त्यांना काम अर्धवट सोडून परत जावे लागत असल्याचीही तक्रार आहे.

या गंभीर प्रश्नाची जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाची व्यवस्था करावी, तसेच नागरिकांना भेडसावणारी ही दीर्घकालीन गैरसोय कायम स्वरूपी दूर करावी, अशी मागणी नरसी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

**फोनला 'ॲलर्जी' की जनतेकडे दुर्लक्ष?; येरसनवाड ग्रामविकास अधिकाऱ्यांविरोधात संताप**

ग्रामपंचायतीतील छोट्या-मोठ्या कामांसाठी नागरिकांकडून वारंवार संपर्क साधूनही नागेश येरसनवाड येथील ग्रामविकास अधिकारी फोन उचलत नसल्याची तक्रार पुढे आली आहे. अनेक वेळा कॉल करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने तसेच परत संपर्कही केला जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या मते, शासकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांशी सुसंवाद ठेवणे अपेक्षित असताना होत असलेल्या या दुर्लक्षामुळे कामे खोळंबत असून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेण्याची मागणी होत आहे.

# कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तात्काळ द्या

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ५ ऑगस्ट -**

मुदखेड नगरपरिषदेतील कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे मागील दोन महिन्यांपासून रखडलेले वेतन तात्काळ अदा करून शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वेतन न मिळाल्यामुळे कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी दि. ३ ऑगस्टपासून बेमुदत संप पुकारला आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून विविध भागांत कचऱ्याचे ढीग साचले आहेत. सार्वजनिक रस्ते, नाले, बाजारपेठ, सार्वजनिक ठिकाणे तसेच निवासी भागांत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने साचलेल्या कचऱ्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया



यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शहरातील घनकचरा व इतर कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून स्वच्छता व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषद प्रशासनाने कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तात्काळ अदा करून त्यांचा संप मागे घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी शहर काँग्रेस कमिटीने केली आहे.

तसेच, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास पुढील काळात काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी जिल्हा संघटक गोविंद गोपनपल्ले, जिल्हा सरचिटणीस गंगाधर डांगे, पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते गिरीश कोत्तावार, सेवादल तालुका अध्यक्ष गंगाधर पा. मगरे, नगरसेवक प्रतिनिधी मुजीब पठाण, नगरसेवक शेख खदीर, शहर उपाध्यक्ष युवा काँग्रेस वेदांत शेवटे, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, शिवानंद देवके, अनिस भाई, सुभाष चौदंते, शेख मोईन भाई, रघुनाथ सोनटक्के, संजय बोकेफोड, यासह आदिंची उपस्थिती होती.

# आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाच्या तयारी निमित्त बैठक

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ५ ऑगस्ट -**

नांदेड येथे दिनांक ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाच्या तयारी निमित्त सिडको येथील जेत्वन बुद्ध विहार येते समाज बांधवांच्या वतीने एक बैठक घेण्यात आली. तसेच सिडको परिसरातील प्रत्येक बुद्ध विहारावर अशा प्रकारच्या बैठकी घेऊन पुढील महामोर्चाचे नियोजन करण्यात येत आहे.

सिडको येथे घेण्यात आलेल्या महामोर्चा बैठकीनिमित्तची बैठक



दिनांक ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी पार पडली. या बैठकीत

आरक्षण उपवर्गिकरण विरोधात दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी निघणाऱ्या भव्य मोर्चाच्या संदर्भात जेतवन बुद्ध विहार, गुरुवार बाजार, सिडको नवीन नांदेड येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी परिसरातील महिलांना, उपासक-उपासिका, युवक-युवतींना ९ ऑगस्ट च्या होणाऱ्या मोर्चामध्ये सामील होण्याचे आवाहन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका सुजाताताई आढाव, शोभाताई हाटकर, कांबळे मॅडम यांच्यासह जेतवन बुद्ध विहार परिसरातील महिलांनी ९ ऑगस्टच्या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने शामिल होण्याचे आश्वासन दिले. मराठवाडा नामविस्तार लढ्यातील शहीद पोचीराम कांबळे यांच्या पुण्यस्मरणदिनी त्यांना श्रद्धांजलीपर अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, भीम कायदा संघटनेचे विलास गजभारे, अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे बा.रा.वाघमारे, डि. के. कांबळे, एकनाथ वाघमारे, अनिल मोरे, शीलवान लांडगे, संदीप महाबळे, मुन्ना वाडे, सम्राट आढाव यांसह अनेक परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी ही रोजगाराभिमुख भाषा : कथाकार राम तरटे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ ऑगस्ट -**

मराठी भाषा ही केवळ साहित्यापुरती मर्यादित नसून पत्रकारिता, कथालेखन, संपादन, मुद्रितशोधन, अनुवाद, माध्यम क्षेत्र तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणारी भाषा आहे. त्यामुळे मराठी ही खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख भाषा असल्याचे प्रतिपादन पत्रकार तथा प्रसिद्ध कथाकार राम तरटे यांनी केले.

यशवंत महाविद्यालयाच्या मराठी विभागात आयोजित उद्बोधन वर्गात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते.

मार्गदर्शन करताना राम तरटे यांनी मराठी विषयातून उपलब्ध होणाऱ्या करिअरच्या विविध संधींचा सविस्तर आढावा घेतला. पत्रकारिता, कथालेखन, संपादन, मुद्रितशोधन, आशयलेखन (कंटेंट रायटिंग), अनुवाद आणि माध्यम क्षेत्रात मराठी जाणकारांना मोठी संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांमध्येही मराठी भाषा व साहित्याचा सखोल अभ्यास यशासाठी महत्त्वाचा ठरतो, असे नमूद करत विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्यासह लेखन, वाचन आणि अभिव्यक्ती क्षमता विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेत 'शिक्षण' आणि 'दीक्षा' या दोन्ही घटकांचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक काळात विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान, बहुविद्याशाखीय अध्ययन आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील ग्रंथालय, डिजिटल सुविधा आणि ई-बुक्सचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी विभागप्रमुख डॉ. संजय जगताप यांनी प्रास्ताविक केले. विभागाचा परिचय डॉ. विश्वधर देशमुख यांनी करून दिला. सूत्रसंचालन कु. प्रज्ञा इंगोले यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. गोदावरी काननुकले यांनी करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांनी केले.

**'बारा आण्याची बोंब' कथाकथनाने सभागृहात हास्यकल्लोळ**

पत्रकार तथा कथाकार राम तरटे यांनी सादर केलेल्या 'बारा आण्याची बोंब' या विनोदी कथाकथनाने विद्यार्थी, प्राध्यापक आणि उपस्थित श्रोत्यांना अक्षरशः खळखळून हसवले. ग्रामीण जीवनातील खुसखुशीत प्रसंग, बिलोली परिसरातील अस्सल मराठी बोलीभाषेचा सहज वापर आणि प्रभावी निवेदनशैली यामुळे सभागृहात अनेकदा हास्याचे फवारे उडाले आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. मनोरंजनासोबतच सामाजिक वास्तवावर भाष्य करणाऱ्या या कथाकथनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

## व्यंकटरमणा शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**हदगाव -** तालुक्यातील अंबाळा येथील व्यंकटरमणा हायटेक इंग्लिश स्कूलने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करीत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शाळेतील इयत्ता चौथीचे ९ आणि इयत्ता सातवीचे १४ असे एकूण २३ विद्यार्थी शिष्यवृत्ती




परीक्षेस पात्र ठरले असून, या यशाबद्दल शाळेचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे. यश हे नशिबाचे नसते तर जिद्द, चिकाटी आणि सातत्याने केलेल्या परिश्रमाचे फळ असते. या विचाराला साकार करीत संस्कृती व पर्यावरण संवर्धन मंडळ संचालित व्यंकटरमणा हायटेक इंग्लिश स्कूल अंबाळा येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला आहे. यावर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथीचे ९ विद्यार्थी आणि इयत्ता सातवीचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. सातवीतील यशस्वी विद्यार्थी अक्षित देशमाने, कु. श्रुती आनेराव, वैष्णवी बोडके, आराध्या उत्तरवार, सांची नरवाडे, अनुष्का कोल्हे, प्रथमेश जीवने, सुहान बहादुरे, शिवप्रसाद कुलकर्णी, आदिती नरवाडे, शंतनू चिंचोलकर, शिवराज पवार, साईराम दुधे, श्रद्धा इंगलवार तसेच चौथीतील विद्यार्थी कु. आनंदी निंबोरकर, सत्कृती कंठाळे, वेदांत कदम, अनुप जाधव, विघ्नेश घुसे, समर्थ पवार, विनया नरवाडे, समर्थ आनेराव, अदिती कदम यांनीही यश मिळवून शाळेचे नाव उंचावले आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे उत्कृष्ट मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रेरित करून विविध मार्गदर्शनपर उपक्रम सातत्याने राबविणारे शाळेचे संस्थापक बालाप्रसाद मुंदडा यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे हे यश शक्य झाले असून, त्यांच्या प्रेरणादायी कार्याबद्दल तसेच शाळेच्या संपूर्ण परिवाराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी केलेला सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य तसेच शाळेच्या व्यवस्थापनाने केलेले योग्य नियोजन, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळेत सातत्याने राबविण्यात येणारे उपक्रम, नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध अभ्यास पद्धतीचा या यशामध्ये मोठा वाटा असल्याचे सांगण्यात येत आहे. या यशामागे शाळेचे संचालक बालाप्रसाद रामप्रसाद मुंदडा, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद यांनी घेतलेले विशेष परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या पालकांनी दाखविलेली जागरूकता महत्त्वाची ठरली आहे. विद्यार्थ्यांनीही मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन करून व्यंकटरमणा हायटेक इंग्लिश स्कूल अंबाळा (ता. हदगाव) या शाळेचे नाव उंचावले आहे.

## सहशिक्षक श्यामसुंदर निवळीकर सेवानिवृत्त

**आदमपूर** -मुखेड तालुक्यातील ग्राम निवळी येथील रहिवासी तथा जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा बाऱ्हाळी येथे कार्यरत सहशिक्षक श्यामसुंदर नागनाथराव निवळीकर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा जुलै अखेरीस भाऊसाहेब देशपांडे मंगल कार्यालयात बाऱ्हाळी येथे दिमाखात संपन्न झाला. यावेळी निवळीकर यांचा ग्रामपंचायत निवळीच्या वतीनेही भव्य सत्कार करण्यात आला. निवळीचे सरपंच शिवसांब अप्पा मठपती, उपसरपंच संभाजी पाटील माळेगावे, पत्नी प्रभावतीताई निवळीकर, बाऱ्हाळीच्या संत कैकाडी महाराज शाळेचे अध्यक्ष सिद्धांत अर्जुनमामा निवळीकर, बालाजी पाटील माळेगावे, जि.प. सहशिक्षिका शालिनीताई राठोड आदी उपस्थित होते.

# हिमायतनगर शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवली

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ५ ऑगस्ट -**

शहरातील गेल्या दिवसांपासून मुख्य रस्त्यांवर दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूककोंडी, अपघातांचा धोका आणि पादचाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन हिमायतनगर नगरपंचायत व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे.

मोहिमेचा प्रारंभ ३ ऑगस्ट रोजी शहरातील महत्त्वाच्या उमर चौक परिसरातून करण्यात आला. नगरपंचायत प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या समन्वयातून झालेल्या या कारवाईमुळे शहरातील उमर चौक परिसरासह परमेश्वर मंदिर परिसर, मुख्य रस्ता, सराफा लाईन, बाजार चौकसह मुख्य रस्ता अतिक्रमणमुक्त झाला असून, नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील

प्रमुख रस्त्यांवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले हातगाडे, दुकानांसमोरील वाढीव शेड, फलक, साहित्य तसेच



इतर अतिक्रमणांमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. काही व्यापाऱ्यांनी स्वतःहून सहकार्य करत आपले साहित्य हटविले, तर काही ठिकाणी प्रशासनाने नियमानुसार कारवाई केली. पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी वांदेकर, कर निर्धारक चिंते, कार्यालय अधीक्षक राहुल बोकारे, नगरपंचायतीचे बांधकाम अभियंता काटकर लिपीक विठ्ठल शिंदे यांच्यासह नगरपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस प्रशासनाचा मोठा फौजफाटा उपस्थित होता. सार्वजनिक रस्ते व जागांवर अतिक्रमण करू नये, रस्ते मोकळे ठेवावेत आणि शहराच्या विकासासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे यावेळी आव्हान करण्यात आले.

# बिलोलीतील बंद एसबीआय एटीएम तातडीने सुरू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ५ ऑगस्ट -**

बिलोली शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे (एसबीआय) बंद असलेले एटीएम तातडीने सुरू करावे तसेच शहरातील जुना बसस्थानक परिसरात एसबीआयचे स्वतंत्र नवीन एटीएम केंद्र सुरू करावे, अशी मागणी बिलोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी एसबीआय बिलोली शाखेचे नूतन शाखा व्यवस्थापक प्रशांत दिसले यांना निवेदन देऊन नागरिकांच्या अडचणींकडे लक्ष वेधले.

बिलोली हे तालुक्याचे प्रमुख प्रशासकीय, व्यापारी, शैक्षणिक, आरोग्य व आर्थिक केंद्र आहे. तालुक्यातील विविध गावांमधून नागरिक दररोज शासकीय कार्यालये, बँका, बाजारपेठ, रुग्णालये, शैक्षणिक संस्था तसेच अन्य कामांसाठी बिलोली शहरात येत असतात. स्टेट बँक ऑफ इंडियाचे बिलोली शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणावर ग्राहक आहेत. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांसाठी एसबीआयच्या एटीएम सेवेचे महत्त्व मोठे आहे.

मात्र, शहरातील एसबीआयचे एटीएम बंद असल्यामुळे ग्राहकांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, व्यापारी,



शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अचानक पैशांची गरज भासल्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. एसबीआयचे एटीएम बंद असल्याने नागरिकांना इतर बँकांच्या एटीएमवर अवलंबून राहावे लागत असून, अनेकदा तेथेही रोकड उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बिलोली हे आरोग्यसेवेच्या दृष्टीने तालुक्यातील महत्त्वाचे केंद्र आहे. ग्रामीण भागातून दररोज मोठ्या संख्येने रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपचारासाठी शहरात येतात. औषधे, तपासण्या व उपचारासाठी तातडीने रोख रकमेची आवश्यकता भासू शकते. अशा वेळी एटीएम सेवा बंद असणे ही गंभीर अडचण ठरू शकते. त्यामुळे एसबीआयचे एटीएम तातडीने सुरू करून नागरिकांना अखंडित सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

बिलोली शहरातील जुना बसस्थानक परिसर हा शहराच्या मध्यवर्ती भागातील अत्यंत वर्दळीचा परिसर आहे. येथे दररोज मोठ्या संख्येने प्रवासी, विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार तसेच ग्रामीण भागातील नागरिकांची ये-जा असते. त्यामुळे या परिसरात एसबीआयचे स्वतंत्र नवीन एटीएम केंद्र सुरू केल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जुना बसस्थानक परिसरात एटीएम उपलब्ध झाल्यास प्रवाशांसह परिसरातील व्यापारी, विद्यार्थी आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना तातडीने पैसे काढण्याची सुविधा मिळेल. त्यामुळे एसबीआय प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून नवीन एटीएम केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केली.

केवळ एटीएम सुरू करणे पुरेसे नसून त्यामध्ये नियमित आणि पुरेशा प्रमाणात रोकड उपलब्ध ठेवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच एटीएमची २४ तास सेवा सुरळीत राहण्यासाठी आवश्यक तांत्रिक देखभाल, सुरक्षा व्यवस्था आणि नियमित देखरेख ठेवावी. तांत्रिक बिघाड झाल्यास तो तातडीने दूर करून सेवा पूर्ववत करण्याची यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

बिलोली शहराची वाढती लोकसंख्या, तालुक्यातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होणारी ये-जा आणि एसबीआयच्या ग्राहकांची संख्या लक्षात घेता शहरात सक्षम एटीएम सुविधा असणे आवश्यक आहे. नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन बंद असलेले एटीएम तातडीने सुरू करावे आणि जुना बसस्थानक परिसरात नवीन एटीएम केंद्र सुरू करावे, अशी ठाम मागणी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केली आहे.

**नूतन शाखा व्यवस्थापक प्रशांत दिसले यांचा नगर परिषदेत सत्कार**

स्टेट बँक ऑफ इंडिया, बिलोली शाखेचा नुकताच पदभार स्वीकारलेले नूतन शाखा व्यवस्थापक प्रशांत दिसले यांचा बिलोली नगर परिषदेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर, महेंद्र गायकवाड, गंगाधर शिंदे, नगरसेवक संदीप कटारे, राजू कुडके, शिवाजी गायकवाड, आखिल सिद्दीकी, शुभम देशमुख, सचिन तोटावार हें उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी नूतन शाखा व्यवस्थापक प्रशांत दिसले यांचे स्वागत करून बिलोली शहरातील एसबीआयच्या ग्राहकांच्या विविध अडचणींबाबत चर्चा केली. विशेषतः बंद असलेल्या एटीएम सेवेमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची माहिती देण्यात आली. तसेच जुना बसस्थानक परिसरात नवीन एटीएम केंद्र सुरू करण्याची गरज त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

नागरिकांना बँकिंग सेवा अधिक सुलभ आणि प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी शाखा प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी व्यक्त केली.